# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY * LIBRARY *
24/4/04

१ ● संपादकीय
६ ● स्पर्धा, बक्षीसे आणि शिक्षण
१२ ● आशा-निराशेच्या चक्रातील चीनमधील भावी पिढी
१६ ● सिंगापूरचे क्रीडा-स्वप्न
१९ ● भारतात औषधांच्या चाचण्यांचा वाढता व्यापार
२४ ● शांततेच्या पाऊलखुणा (युद्धविरोधी योद्धा !)
२७ ● जगाच्या पाठीवर....
२९ ● कालप्रवाहात......
● अर्थबोधपत्रिका पुरवणी
(भारतातील डाव्या मंडळींशी हितगुज)

खंड ३ : अंक १ एप्रिल २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**वर्गणीसाठी पत्ता :**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ३ (अंक १) एप्रिल २००४**
**संपादक - रमेश पानसे**
**संपादन साहाय्यक - राज्यश्री क्षीरसागर**
◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?
## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.**
◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न.
◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.
◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

## 'अर्थबोधपत्रिके'ची भूमिका व वाचकांच्या अपेक्षा

'अर्थबोधपत्रिके'च्या रीतसर नोंदणीनंतर या द्वैमासिकाचे पहिल्या खंडामध्ये सहा अंक आणि त्यानंतर, मासिकात रूपांतर झाल्यानंतर दुसऱ्या खंडामध्ये बारा अंक प्रसिद्ध करण्यात आले. या अंकापासून खंड तिसरा सुरू होत आहे. द्वैमासिकाचे मासिकात रूपांतर झाल्यापासून कितीतरी अधिक मजकूर आम्ही वाचकांना देऊ शकलो. उदाहरणार्थ, गेल्या वर्षभरात ४८० पानांचा मजकूर आणि तोही केवळ १००रु पर्यंत वर्गणीदारांना घरपोच मिळू शकला. (हल्ली ४८० पानांच्या एखाद्या ग्रंथाची किंमत सहजच ३०० ते ४०० रुपयांच्या घरात असते !) वर्गणीदारांनी वर्गणीच्या रूपाने दिलेले पैसे आणि त्याचा पानांच्या संख्येच्या रूपांत मिळालेला मोबदला यांचे हे गणित मर्यादित अर्थानेच घ्यायचे. कारण, किती पाने दिली यापेक्षाही ती कशी दिली, कोणत्या प्रकारचा मजकूर वाचकांना उपलब्ध झाला हे समजणे महत्त्वाचे आहे.

गेल्या वर्षभरात (एप्रिल २००३ ते मार्च २००४) 'अर्थबोधपत्रिके'त किमान ९५ लेख प्रसिद्ध करण्यात आले. यासाठी आंतरराष्ट्रीय ते राष्ट्रीय अशा पातळ्यांवरील २५ ते ३० पेक्षा जास्त संदर्भ शोधण्यात आले. साधारणपणे खालील विषयांवरील लेख प्रसिद्ध झाले. सामाजिक (१८), राजकीय (१५), आर्थिक व औद्योगिक (२०), शैक्षणिक (५), विज्ञान-तंत्रज्ञान (३), संशोधन विषयक (६), आरोग्य (३) आणि इतर विषयांवर २०-२२ असे विविध लेख आम्ही प्रसिद्ध केले. आजच्या जगात, युद्धांच्या छायेत शांततेकडे नेणाऱ्या मार्गांचे महत्त्व जाणून आम्हाला तेही वाचकांपुढे आणावेसे वाटले म्हणून 'शांततेच्या पाऊलखुणा,' हे सदर गेल्या वर्षभरात प्रसिद्ध झाले. याशिवाय काहीतरी वेगळा पण छोटासा विषय वा आकडेवारी नजरेपुढे आणणारी 'जगाच्या पाठीवर' आणि 'कालप्रवाहात' अशी सदरेही प्रसिद्ध करण्यात आली. किमान ३० वाचकांचे प्रतिसाद प्रसिद्ध करण्यात आले.

अर्थबोधपत्रिका १९९८ साली सुरू झाली तीच मुळी काही एक विशिष्ट अशी भूमिका घेऊन. नोव्हेंबर १९९८ला अर्थबोधपत्रिकेचा नमुना अंक प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर जानेवारी १९९९ला दुसरा अंक प्रसिद्ध झाला. (खरे तर हाच पहिला अंक म्हणावयाचा !) त्यामध्ये प्रकाशकांची ही पत्रिका सुरू करण्यामागची भूमिका स्पष्टपणे मांडण्यात आली होती. ती अशी -

"सर्वसामान्य मराठी वाचकांना आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयांवरील अभ्यासपूर्ण माहिती देणे, व विविध समस्यांच्या संदर्भातील संकल्पनात्मक बाबी समजावून देणे हे यामागील उद्देश आहेत. अशा विषयांवरील सखोल महिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके, जी साधारणपणे मराठी वाचकांपर्यंत पोचत नाहीत, अशांमधील माहिती व विश्लेषण यांच्या आधारे लिहिलेल्या लेखांचा अर्थबोधपत्रिकेत समावेश असेल."

आज आपण, आजच्या कालाचे वर्णन, 'ज्ञानाचे युग' असे करतो, 'ज्ञानाचा विस्फोट' झाला आहे अशी आपली भाषा असते. माहिती-तंत्रज्ञानावर आधारित 'ज्ञानउद्योग' हा आजचा सर्वात मोठा, मानाचा आणि पैशाचा उद्योग मानला जातो. 'ज्ञानाधारित समाजनिर्मिती'ची भाषा आपण करीत असतो. अशा वेळी, अनेक तंत्रांनी, अनेक संशोधनांकरवी, अनेक शास्त्रांतून, नवनवे विचार प्रसृत होत आहेत. अशा गोष्टी केवळ 'नवीन' म्हणून महत्त्वाच्या नसतात, तर जवळून किंवा दूरून, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आपल्या दैनंदिन जीवनाशी त्यांचा संबंध असतो; म्हणून आपण त्या सजगपणे जाणून घ्यायच्या असतात.

सामान्यतः दैनिक वृत्तपत्रे तात्कालिक महत्त्वाच्या बाबींवरच, स्वभावतः, लक्ष पुरवतात. इतर अनेक साप्ताहिके वा मासिके, करमणूक, साहित्य, क्रीडा, कला, चित्रपट अशा पण तात्कालिक महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयांवर वाचकांना बहुश्रुत करीत असतात. अशा प्रसारमाध्यमांतून जे येणे कठीण असते, किंवा वेगवेगळ्या कारणांमुळे येत नाही, अशा प्रकारची माहिती वाचकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिका' करीत असते. प्रामुख्याने इंग्रजी पुस्तके वा नियतकालिके आणि आता इंटरनेटद्वारे उपलब्ध होणारे, परंतु सहजी मराठी वाचकांकडे पोचू न शकणारे असे वाङ्‌मय हुडकून काढून ते देण्याचा प्रयत्न अर्थबोधपत्रिका करीत असते. अलीकडे, आम्ही पहिल्या पानाच्या वरच्या बाजूस, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे एक विधान देत असतो. वाचकांचे त्याकडे लक्ष गेलेच असेल; परंतु त्याचा उल्लेख पुनश्चः करायला हवा. तर्कतीर्थांनी म्हटले आहे, "जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार निर्माण करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे." हे महत्त्वाचे नि कठीण कार्य होत राहावे, असा अर्थबोधपत्रिकेचा प्रयत्न राहिला आहे. हे कार्य अर्थबोधपत्रिकेच्या पणतीने किती प्रकाशील ही मर्यादाही

आम्हाला ठाऊक आहे. तरीही, आणि किंबहुना ते कठीण आहे म्हणूनच सातत्याने करीत राहिले पाहिजे याचीही आम्हास जाणीव आहे.

या नववर्षाच्या सुरूवातीच्या अंकात, अर्थबोधपत्रिकेच्या भूमिकेविषयी इतक्या सविस्तरपणे लिहिण्याचे कारण, वाचकांच्या उदंड प्रतिसादात आहे. अर्थबोधपत्रिका सामान्यत: वाचकांना आवडते आहे, हवीशी वाटते आहे, हे वाचकांच्या पत्रांवरून आम्हाला कळते. अर्थात, हे मासिक एक विशिष्ट पण व्यापक भूमिका घेऊन चालविले जात असले, तरी वाचणारा प्रत्येक वाचक त्याच्या त्याच्या भूमिकेतून या अंकाकडे पाहात असतो. वाचकांच्याही अनेक अपेक्षा असतात; आणि ते त्या मोकळेपणी कळवतातही. परंतु त्यांच्या सर्वच अपेक्षांची पूर्ती आमच्या अनेक मर्यादांमुळे आम्ही करू शकत नाही. पण, त्यातही सर्वात महत्त्वाची आणि आम्ही आमच्यावर घालून घेतलेली मर्यादा आहे ती, आत्तापर्यंत स्पष्ट केलेल्या आमच्या भूमिकेची आहे. जे एरवी वाचकांना सहजपणे उपलब्ध होते, त्याकडे पत्रिका सामान्यत: वळत नाही. शिवाय असा एखादा विषय, मग तो भारतीय शेतीचा असो वा सहकाराचा, खगोलविज्ञानाचा असो वा उद्योगांचा असो, तोच एकमेव लावून धरला जात नाही. अनेक वाचकांच्या या प्रकारच्या सूचना असतात, म्हणून हे स्पष्टीकरण.

वाचक अनेक प्रकारच्या सूचना करतात. त्यांना उद्योगांच्या संदर्भातील देशादेशांची तुलना हवी असते, किंवा लेखांमधून भारतीय समाजावर, त्यांच्या प्रश्नांवर भर हवा असतो. "अर्थबोधपत्रिकेत नवीन कल्पनांचे, विचारांचे स्वागत करताना वास्तव तसे आहे काय हे जाणून घ्यावे, वास्तवाला भक्कम अस्तित्ववादी आधार असतो," असा आदेशवजा उपदेशही वाचक करतात. परंतु, वास्तवाचा शोध घेण्याची ही प्रक्रियाच मुळी अनंत अशी आहे. खरे तर नवनवीन कल्पनांची मांडणी करणे ही त्या अनंत मार्गावरीलच पहिली पायरी आहे. आम्ही ती करू शकतो, करतो.

वाचकांचे असेही म्हणणे असते की अर्थबोधपत्रिकेत केवळ संकलित लेख नसावेत तर स्वतंत्र लेखही असावेत. काही वाचक तर, आपणही यात स्वतंत्र लेखन करावे, असे वाटणारे आहेत आणि ते आपले असे लेख अर्थबोधपत्रिकेकडे आवर्जून पाठवतातही. परंतु अर्थबोधपत्रिका त्यांना का स्वीकारू शकत नाही, हे त्या वाचक-लेखकांना एव्हाना स्पष्ट झाले असेल. अर्थबोधपत्रिकेच्या आजच्या असलेल्या स्वरूपास स्वीकारूनही वाचक काही अपेक्षा करीत असतात. त्यांना यात आणखी पाने

*(पान क्रमांक ४ वर )*

# वाचकांचा प्रतिसाद

'आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध (राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक) घटनांचा अर्थबोध करून देणारे मासिक' मी पहिल्या नमुना अंकापासून वाचत आहे. मासिकाची कल्पना व मांडणी आवडल्यामुळे त्याचा आकार लहान असूनही मी अनेक मित्रांना शिफारस करीत असतो. तथापि अलीकडच्या काही अंकांपासून या मासिकाला एक साचेबंद स्वरूप येत आहे असे वाटत आहे.

आपल्या मासिकातून माझ्यासारख्या सामान्य वाचकाला काय हवे असते ? आम्ही जे आंतरराष्ट्रीय स्तरावरील साहित्य वाचू शकत नाही, ते आपण इंटरनेटच्या मदतीने संकलित करून, त्या त्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे आणि सोप्या भाषेत देता, हे मान्य. तरी आपल्या बहुधा सर्वच अंकांमध्ये अमेरिकेत काय चालले आहे, चीनमध्ये काय घडते आहे हे लेख नियमाने प्रसिद्ध होतात. याबरोबर भारतातील अर्थ, औद्योगिक, शिक्षण क्षेत्रांत काय घडतेय आणि (जास्त) बिघडतेय याचा अपवादानेच अंतर्भाव होतो.

(पान क्रमांक ५ वर )

(पान क्रमांक ३ वरून )

वाढवून हवी असतात; किंवा काही वेळा लेख अधिक विस्तृत स्वरूपांत हवे असतात. लेखांमध्ये रेखाचित्रे, आलेख यांचा उपयोग केला जावा, असेही कोणी वाचक सुचवितात. एक वाचक तर, अंक आवडून या मासिकाचे पाक्षिकात रूपांतर व्हावे, असा प्रेमाचा सल्लाही देतात.

वाचकांच्या विविध सूचना, विविध अपेक्षा यांचे, अर्थबोधपत्रिका आपल्या भूमिकेच्या मर्यादेत, स्वागतच करीत आली आहे, हे गेल्या दोन वर्षांतील अंकाच्या सतत बदलत्या रूपावरून वाचकांच्या लक्षात येत असेलच; किंबहुना, जो काही बदल वेळोवेळी होत गेला आहे त्यामागे आमच्या कल्पनांपेक्षा वाचकांच्या अपेक्षाच जास्त आहेत, याची ग्वाही आम्ही देतो. अर्थबोधपत्रिकेची दुर्बलता अनेक अंगांनी आहे, तरीही वाचकांच्या विविध पत्रांचा लघुत्तम साधारण विभाज्य (लसावि) काढला तर ही पत्रिका वाचकांना आवडते आहे, असाच तो येईल असे वाटते. आणि हीच अर्थबोधपत्रिकेची सबलता आहे असे आम्ही मानतो. वाचकांचा प्रतिसाद वाढत्या प्रमाणात मिळत राहावा, अशी आमची अपेक्षा मात्र आज आम्ही आवर्जून व्यक्त करीत आहोत. ■■

(पान क्रमांक ४वरून )

अमेरिकेच्या राजकीय, व्यापारी धोरणांवर सतत टीका हे तर आपल्या मासिकाचे उद्दिष्ट नसावे ! चीनमधील राजकारण, प्रसारमाध्यमे, ग्रंथव्यवहार याचे आपणाला जसे कुतूहल वाटते त्याहून भारतातील सतत ढासळत्या परिस्थितीवरील लेखन मात्र आपण कटाक्षाने कमीतकमी प्रसिद्ध करता. कदाचित ते तर आम्ही वाचक इतरत्र वाचतो असे आपल्याला सुचवायचे असते काय ? आज भारतातील सत्ताधीश जरी खऱ्याखोट्या फील गुड फॅक्टरने स्वतःभोवती स्तुतीचे वलय निर्माण करून आगामी निवडणुका जिंकू पाहात असतील तरी प्रत्यक्षात तसे आहे का ? तब्बल पन्नास वर्षांनंतरही भारतीय लोकशाही आत्मा हरविल्यासारखी अस्तित्वात आहे. तत्त्वाशी फारकत घेऊन राष्ट्रीय पक्ष आज कोणाशीही साटेलोटे संबंध प्रस्थापित करीत आहेत. केवळ सत्ता संपादन करण्यापलीकडे राजकीय पक्षांचे कार्य शिल्लक राहिलेले नाही. संगणकीय क्षेत्राचा अपवाद वगळल्यास इतर साऱ्या निर्मिती क्षेत्राचे चक्क वाटोळे होत आहे.

महाराष्ट्रातील मफतलाल, किर्लोस्कर, गरवारे या दिग्गजांच्या उद्योगांची आज काय परिस्थिती आहे ? या निराशेच्या गर्तेतून बाहेर येऊन जागतिक स्पर्धेत वर मान करून टिकणारे थोडे उद्योजक जे आहेत त्यांच्याविषयीची माहिती आपल्या मासिकात का येऊ नये ? माझ्यासारखा वाचक आज आपल्याकडून ही अपेक्षा करत असेल तर ते चूक आहे काय ? गुळगुळीत कागदावरील रंगीत छायाचित्रांनी नटलेले प्रसिद्धी माध्यम आज मुबलक असले तरी सामान्य शेतकरी, गुंतवणूकदार, कर्मचारी (सरकारी/ खाजगी संस्थाचा), उद्योजक हे समोर ठेवून आपले मासिक प्रसिद्ध व्हावे ही माझी माफक अपेक्षा आहे. येणाऱ्या खुशीपत्रांहून साधक बाधक चर्चेला आपल्या मासिकात स्थान असावे. *मंगेश नाबर, परळ, मुंबई.*

अर्थबोधपत्रिकेत अनेकविध विषयांवर विचारप्रवर्तक माहिती मिळते, हे मासिक दर्जेदार व कालसुसंगत आहे. *अविनाश सुळे,*

'अर्थबोधपत्रिके'चे अंक वाचनीय आहेत, हे निःसंशय. किंबहुना अनेक लेख 'वैचारिक खाद्य' पुरविणारे (आणि Brain Storming) असतात. वैज्ञानिक लेखांचा अंतर्भाव वाढविता आल्यास, प्रयत्न व्हावा. *प्रा. संजीव वाडीकर, सातारा.*

आपला अंक खूप वाचनीय आहे. ज्ञानात भर घालण्यासाठी खूप माहिती मिळते. अंकाची पाने वाढवावी. *पूनम तांबे, कांदिवली, मुंबई.*

शैक्षणिक

# स्पर्धा, बक्षीसे आणि शिक्षण

"आनंद मिळविण्यासाठी आपल्याला स्पर्धा करण्याची गरज नसते. खरं तर असं आहे की, आपण जेव्हा स्पर्धा करीत असतो तेव्हा आपण अतिशय असमाधानी असतो; कारण, निसर्गतःच ओाप्ण सहकारी प्राणी असतो."

एन. डेविस यांनी ईस्ट अँगलिया विद्यापीठात 'फिलॉसॉफिकल अँड एज्युकेशनल रिनिवल'च्या सभेपुढे भाषण करताना (८मार्च १९९७), वरील विधानापासूनच आपल्या भाषणाची सुरूवात केली होती. सुरूवातीलाच त्यांनी, डब्ल्यू. एडवर्डस् डेमिंग यांच्या शिकवणुकीचा, विशेषतः डेमिंग यांच्या स्पर्धेपेक्षा सहकाराला महत्त्व देणाऱ्या भूमिकेचा, आवर्जून उल्लेख केला.

डेमिंग हे व्यक्तीपेक्षा व्यवस्थेवर अधिक भर देतात. कुटुंब, शाळा, शाळेतील वर्ग, व्यवसाय किंवा अगदी संपूर्ण देश या विविध स्तरांवरील संस्था आहेत; 'व्यवस्था' आहेत. आणि या व्यवस्थांचे व्यवस्थापन नेटके व्हावे या हेतूने डेमिंग आपले विचार मांडतात. आज या किंवा अशा संस्थांच्या व्यवस्थापनात, प्रामुख्याने, फार मोठा वेळ लोकांना साहाय्य करणे, प्रशिक्षण देऊन तयार करणे, अनुक्रम लावणे अशा प्रकारच्या गोष्टींमध्ये घालविला जातो. "माझे व्यवस्थापन गचाळ असूनही गॅलरीमधले फर्निचर नशिबवान नि यशस्वी ठरले. व्यक्तींच्या बाबतीत मात्र मी, त्यांचे खच्चीकरण करीत होतो, त्यांच्या अंतर्गत प्रेरणा मारीत होतो नि त्यांचा कामातील आनंदही हिरावून घेत होतो." असे स्वतःबद्दल डेमिंग यांनी म्हटले आहे. डेमिंग यांनी एक नवीनच विचारसाखळी निर्माण केली आहे. या नवविचारात, व्यवसायातील गुणवत्ता सुधारते, उत्पादनखर्च कमी होतो, उत्पादकता वाढते, ग्राहकांसाठी किंमती खाली येतात, त्यामुळे स्वतःसाठी आणि इतरांसाठी बाजारपेठ विस्तारते. याचा अर्थ असा की, अशी एखादी व्यवस्था असू शकते की जिच्यात सर्वच जिंकतात, हारत कोणीच नाही. 'सर्वच जिंकतात' हे डेमिंगच्या विचारातील मध्यवर्ती सूत्र आहे. त्याच्या दृष्टीने स्पर्धा ही अशी कीड आहे की जी सबंध व्यवस्थाच खाऊन टाकते', नाहीशी करते.

यासाठी संपूर्ण व्यवस्थेचाच फेरविचार करायला हवा आहे. आजपर्यंत आपल्या विचारांवर ज्यांचा पगडा आहे, अशी विश्लेषणपद्धती वापरून, किंवा अशा प्रक्रियांचे

विच्छेदन करून, याचे आकलन होण्यासारखे नाही. त्यासाठी नवी आकलनपद्धती, नवीन आकलनशास्त्र आपलेसे करण्याची गरज आहे. डेमिंग यांनी चार अंगांनी विचार करून आपल्या 'सखोल ज्ञानाची पद्धती' (सिस्टिम ऑफ प्रोफाऊंड नॉलेज) बांधलेली आहे. ही चार अंगे म्हणजे, संपूर्ण व्यवस्थेची पारख करणे, असलेली तफावत कळणे, ज्ञानविषयक सिद्धान्तन आणि मानवी गरजा व प्रेरणांची समज देणारे मानसशास्त्र. आपल्या प्रश्नांच्या आकलनासाठी नि त्यांच्या सोडवणुकीसाठी ही विचारक्षेत्रे लक्षात घ्यायला हवीत, असे डेविस म्हणतात.

कोणत्याही व्यवस्थेतील विस्कळितपणा शोधण्यासाठी, डेविस यांनी, डेमिंग यांच्या विचारांच्या आधारे काही निकष दिले आहेत. उदाहरणार्थ, त्यांनी शिक्षकांना असे आवाहन केले आहे की, त्यांनी आजच्या शिक्षणव्यवस्थेत असे काही आढळते का, ते शोधून पाहावे:- कर्मचाऱ्यांमध्ये ताणतणाव, स्वतंत्र ठेवण्याऐवजी नियंत्रण करणारे नेतृत्व, सेवेची संधी वाटण्याऐवजी लादलेले ओझे वाटणारी विद्यार्थ्यांबाबतची वृत्ती, प्रश्न सोडविणारांपेक्षा प्रश्न निर्माण करणारांची संख्या मोठी, मिळणारी यशस्विता म्हणजेच ठरविलेले ध्येय, अशी भावना.

डेविस यांनी आपल्या भाषणात, पुढे, सामाजिक मानसशास्त्रातील संशोधनांच्या आधारे, शिक्षणक्षेत्रातील स्पर्धा आणि बक्षीसे यांच्या परिणामांचा वेध घेतला आहे. त्यासाठी त्यांनी, अल्फी कोहन यांच्या 'नो कॉंटेस्ट' आणि 'पनिश्ड बाय रिवार्डस्' या दोन ग्रंथांमधील विवेचनातील संबंधित धागेदोरे आपल्यासमोर ठेवले आहेत.

१९७० च्या दशकापासूनच्या अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले आहे की, एखाद्या गटाला, विशिष्ट उद्दिष्टपूर्तीसाठी उत्तेजनपर बक्षीसे ठेवली तर, त्या गटाचे काम बक्षीसे नसलेल्या गटापेक्षा कमी किंवा कमी दर्जाचे असते. हा सर्वसामान्य निकर्ष, अगदी विविध प्रकारच्या कामांच्या नि लोकांच्या संदर्भात, खरा ठरला आहे. शालेय मुलांच्या बाबतीतही हा अनुभव आला आहे. गणिताचा गृहपाठ करण्यासाठी जेव्हा बक्षीसाची लालूच दाखविली गेली, तेव्हा त्या मुलांना त्या कामाचा आनंद तर घेताच आला नाही, पण त्यांच्या कामाची प्रतही कमी होती.

शिक्षणाच्या पद्धतीवर आणि त्यातील बक्षीसे, शिक्षा, स्पर्धा, परीक्षा, शिस्त या साऱ्या घटकांवर, गेली शतकभर वर्तनवादी विचारांचा प्रभाव आहे. मुलांना आपल्या वर्तनात, उत्तेजन देऊन किंवा भीती दाखवून, बदल करायला लावता येतो आणि एखादी गोष्ट जरबेने पुन्हा पुन्हा करायला लावून ती त्याच्या अंगवळणी पाडता येते,

असे शतकापूर्वीचे (पण आता बऱ्याच प्रमाणात कालबाह्य झालेले) मानसशास्त्र सांगत होते. त्यावर आधारलेली आणि आजवर, त्याचीच पठडी बनून टिकून राहिलेली जी शिक्षणव्यवस्था आहे तिला 'वर्तनवादी शिक्षण व्यवस्था' असे म्हणतात.

## बक्षीसे, स्पर्धात्मकता व वास्तविकता

वर्तनवादी विचारांत असे मानले जात होते की बक्षीसे-शिक्षा यांचे आपल्याला अपेक्षित असे प्रतिसाद मिळतील. परंतु अलीकडच्या वीसापेक्षाही जास्त अभ्यासांमधून असे आढळले आहे की ज्यांच्यासाठी प्रोत्साहक बक्षीसे ठेवली, त्यांची कामगिरी निकृष्ट दर्जाची असते. अगदी सामाजिक वर्तनांच्या संदर्भात, म्हणजे धूम्रपान सोडणे किंवा वजन कमी करणे, अशा तऱ्हेच्या उपक्रमांमध्येही प्रोत्साहक बक्षीसांचा परिणाम फारसा दिसून आलेला नाही. असाच अनुभव, बक्षिसाची लालूच दाखवून मुलांना उदार करू पाहण्याच्या प्रयत्नांमध्ये आलेला आहे. कारण, अशा प्रयत्नांत मुलांची अशी समजूत होत असते की तुम्ही काहीतरी बक्षीस देणार आहात म्हणूनच (आणि तरच) उदारता दाखवायची असते. (अन्यथा त्याची गरज नाही !)

कोहन यांच्या म्हणण्यानुसार कोणत्याही प्रकारच्या प्रोत्साहनपर योजनेने, आजवर कधीही, कामगिरी सुधारण्यावर कायमस्वरूपी परिणाम झालेला नाही. कोहन यांच्या 'पनिश्ड बाय रिवॉर्डस्' या चारशे पानी ग्रंथात, नेहमी शाळांमधून या दिशांनी केलेली कामे कशी फसतात याचे पुरावे जागोजागी विखुरलेले आहेत. स्पर्धात्मकतेचाही असाच परिणाम आहे. जेव्हा कामावरून लोकांची तुलना केली जाणार आहे, म्हणजे स्पर्धा आहे, असे सांगितलेले असते, तेव्हा तेव्हा लोकांच्या कामाची गुणवत्ता घसरत असते. हा परिणाम अगदी गणितापासून ते चित्रकलास्पर्धांपर्यंत आढळून आला आहे.

शास्त्रज्ञांच्या संदर्भात केलेल्या एका अभ्यासामध्ये त्यांच्यातील स्पर्धात्मकता आणि त्यांची यशस्विता यांच्या परस्परसंबंधांबाबत अभ्यास केला तेव्हा, असे आढळले की, जे खूप यशस्वी झाले होते त्यांच्यात स्पर्धात्मकता अत्यल्प होती. हा निष्कर्ष धक्कादायक वाटला तेव्हा, असाच अभ्यास मानसशास्त्रज्ञ, व्यावसायिक लोक, विद्यापीठांमधील विद्यार्थी, विमानाचे पायलट यांच्याबाबत केला, तेव्हाही निष्कर्ष तोच निघाला. निसर्गात स्पर्धा आहे, मनुष्यही निसर्गत:च स्पर्धात्मक आहे, असा एक समज, गेल्या दीड-दोन शतकांत, लोकांच्या मनांमधून रुजला आहे. डार्विनचे तत्त्व 'जगायला योग्य तेच तरतात' ('सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट' - खरे तर हा वाक्प्रचार हर्बट स्पेन्सर यांचा आहे !) हेच अखिल विश्वात अस्तित्वात आहे; या समजुतीला आता नव्या

संशोधनातून धक्का मिळालेला आहे. वेरो वीन्स एडवर्डस् यांचा 'अॅनिमल डिस्पर्शन इन रिलेशन टू सोशल बिहेवियर' हा ग्रंथ १९६२ मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या अभ्यासाचा निष्कर्ष असा आहे की ज्या प्राण्यांनी, पुनर्उत्पत्ती आणि नैसर्गिक साधनांचा वापर यांबाबत मनोनिग्रह दाखवला आहे, ती प्राणीजात अधिक काळ टिकून राहिली आहे; आणि म्हणून उत्क्रांतीच्या काळात संख्येवरचे नियंत्रण अस्तित्वात आले.

कोहन यांचे यासंदर्भातील एकूण विचार, डेविस यांनी थोडक्यात दिले आहेत. ते आपल्याला मार्गदर्शक आहेत.

•बहुतेक प्राणीजाती, प्रजातींमध्ये परस्परसहाय्य हे अधिक उत्पादक ठरलेले आहे. स्पर्धा ही खोलवरच्या अपयशाच्या भावनेतून निर्माण होते.

•आपण स्पर्धा करतो कारण, आपल्याला तशा पद्धतीने वाढविले आहे. आपण तसे जन्मलो आहोत, म्हणून नव्हे.

•स्पर्धा ही चिंतावृद्धी करणारी बाब आहे, कारण, एखाद्या घटनेतील कार्यकारण संबंधाची साखळी तिने लपवून ठेवलेली असते. त्यामुळे ती वरवरच्या ती थातुरमातुर स्पष्टीकरणाकडे नेत असते.

•स्पर्धा ही आपल्या चिंता नियंत्रणाबाहेर वाढवीत असते.

स्पर्धेच्या अस्तित्वामुळे आपली सातत्यपूर्ण सुधारणेची भावना दाबली जाते. स्पर्धेमुळे आपला आत्मसन्मान कमी होतो.

•स्पर्धेमुळे, दुसऱ्याकडे अपेक्षित स्पर्धक म्हणून पाहण्याची वृत्ती बळावते व त्यामुळे आपल्या परस्परसंबंधात अडथळा निर्माण होतो.

•स्पर्धा ही बाह्य उत्तेजना असते त्यामुळे कामाचा आनंद कमी होतो.

स्पर्धा ही माणसांना एकत्र येऊ देत नाही.

•संगीत खुर्चीच्या खेळाप्रमाणे ती संपूर्ण खोली हरलेल्यांनी भरून टाकत असते.

## <u>वास्तवोपचार **(Reality Therapy)**</u>

अमेरिकन मानसोपचार तज्ज्ञ विल्यम ग्लेसर यांनी असे प्रतिपादन केले आहे की या सर्व संकल्पना शिक्षणात आणल्या पाहिजेत. आणि त्यासाठी त्यांनी स्वतः दिलेले वास्तोवपचाराचे तंत्र हे आजच्या ताणपूर्ण शिक्षणाच्या वातावरणात उपयोगी आहे. ते जगात अनेक ठिकाणी वापरलेही जाऊ लागले आहे. या वास्तवोपचारांत एक सातत्याने चाललेली प्रक्रिया गृहीत धरली आहे. या प्रक्रियेचे दोन घटक आहेत. एक, विश्वासचे वातावरण निर्माण करणे आणि दोन, प्रत्यक्षपणे व्यक्तीला, स्वतःला नेमके

काय हवे आहे, त्यासाठी ती आत्ता काय करीत आहे, याचा शोध घ्यावयास लावणे आणि मग त्याआधारे आपल्याला जे मिळवायचे आहे, त्यासाठी परिणामकारक नियोजन करणे. या तंत्रामध्ये शिक्षा, बक्षीसे आणि स्पर्धा यांची शिक्षणातून उचलबांगडी करून त्यांच्याजागी ग्लेसर यांची कौन्सिलिंगची पद्धती वापरली जाते. या पद्धतीत चार प्रकारचे प्रश्न विचारले जातात. ते म्हणजे, तुम्हाला काय हवे आहे ? तुम्ही काय करता आहात ? मूल्यमापनाची तुमची रीत योग्य आहे काय ? आणि तुमची नेमकी योजना काय आहे ?

'वास्तवोपचारा'च्या या तंत्रानुसार शिक्षक या प्रश्नाची उत्तरे शोधू लागल्यास, शिक्षकांमध्येच परिवर्तन होते. आजवर जो विद्यार्थ्यांच्या आनंददायी अध्ययनाच्या प्रक्रियेतच अडथळा म्हणून होता तो शिक्षक आता विद्यार्थ्यांचा हितकर्ता बनतो; विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजा भागविण्यास सहाय्यक ठरू शकतो. ग्लेसर म्हणतात की, आपल्याला कुणी आपले मानावे, इतरांनी आपल्याला स्वीकारावे, ही माणसाची मूलभूत भावनिक गरज असते. आपण कुणाला तरी हवे आहोत, आपली कुणाला तरी कदर वाटते, दखल घ्यावीशी वाटते, यातूनच 'आपण कुणीतरी आहोत,' अशी आत्मसन्मानाची भावना निर्माण होते; आपल्या म्हणण्याला किंमत येते. अर्थातच, शिक्षणातून अशी तयारी नि वागणूक निर्माण होणे याला महत्त्व आहे.

डेविस म्हणतात ते खरे आहे. शिकविण्यातून दुसऱ्याला प्रेरित काही करता येत नाही; करता येते ती फक्त प्रेरित करणाऱ्या वातावरणाची निर्मिती. प्रेरक वातावरणातून मग शिक्षकाच्या कार्याचा दर्जा उंचावता येऊ शकतो. सामाजिक मानसशास्त्रातील संशोधनाने आता असे दाखवून दिले आहे की, ज्यावर आजची सार्वत्रिक - औपचारिक शिक्षणव्यवस्था आधारलेली आहे, तो वर्तनवाद आता मानवीवर्तणुकीचे प्रतिमान म्हणून अत्यंत अपुरा आणि अयोग्य आहे; आणि तरीही आपल्या जवळजवळ सर्व आंतरक्रियांचा तोच आधार आहे. कुटुंबात, शाळेत किंवा उत्पादनसंस्थांमध्ये शिक्षा, बक्षीसे आणि स्पर्धा यांचे खरोखरच काय स्थान आहे, याची तपासणी करायला हवी आहे. कारण, तो फार मोठा सामाजिक प्रश्न आहे. या गोष्टींमुळे मुख्यतः जीवनातील सर्व प्रकारच्या कार्यांच्या दर्जावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

विल्यम ग्लेसर यांनी, या 'वर्तनवादा'ला 'निवड सिद्धांता'च्या रूपाने पर्याय उपलब्ध करून दिला आहे. हा 'निवड सिद्धांत' कोणत्याही मनुष्याला असलेल्या चार प्रकारच्या मूलभूत गरजांवर म्हणजे गरजांच्या पूर्तीवर आधारलेला आहे. या चार गरजा

अशा आहेत; एक, आपल्यापैकी प्रत्येकालाच निदान एकातरी व्यक्तीच्या प्रेमाची आस असते, प्रेम द्यावेसे वाटते; दोन, प्रत्येकालाच एक समाजमान्यता आणि स्वतःवरची हुकुमत आवश्यक असते. त्याने आपल्याला आत्मसन्मानाची जाणीव प्राप्त होत असते. तीन, स्वतःसाठी आणि इतरांसाठीही आपण स्वातंत्र्यप्राप्तीची आकांक्षा ठेवीत असतो; यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतो; आणि चार, कित्येकदा आपण इतरांबरोबर अनेक करमणुकीच्या उपक्रमांत सहभागी होत असतो, त्यांत आनंद मिळवीत असतो. या गरजांच्या पूर्तीसाठी विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याची आपली प्रेरणा ही अंतर्गत प्रेरणा असते; आणि या ज्ञानाचा - माहितीचा वापर करण्याच्या बाबतीतील निवड, आपण स्वतःची स्वतःच करीत असतो. याबाबतीत वर्तनवादापेक्षा हा पर्याय वेगळा आहे. कारण, वर्तनवादातील प्रेरणा ही बाह्य प्रेरणा असते. तिच्यासाठी बक्षीसे, स्पर्धा किंवा शिक्षांचा वापर करावा लागतो, आणि तो तसा केल्यास एकूण जीवनातील गुणवत्तेचे मानच घसरते.

या विविध कल्पनांची सांगड घालून डेविस यांनी आजच्या शिक्षणपद्धतीतील परिवर्तनाच्या दृष्टीने, त्यांच्या लेखात काही मांडणी केली आहे. आजच्या पठडीबद्ध शिक्षणाचा आधार असलेला, मानवी वर्तणुकीबाबतचा वर्तनवाद (बिहेवियरीझम) आणि विल्यम ग्लेसर यांनी सुचविलेला निवड सिद्धान्त (चॉईस थिअरी) या एकमेकांबरोबर जाणाऱ्या बाबी नाहीत, असे सांगून त्यांनी, मूलभूत परिवर्तनाचाच आग्रह धरला आहे. डेविस यांनी सुचविले आहे की, एक, शिक्षणातून आजवरच्या वर्तनवादी दृष्टिकोणास, पूर्णतः रजा दिली पाहिजे; दोन, त्या अनुषंगाने आलेल्या बक्षीसे आणि शिक्षा यांना शिक्षणात थारा असता कामा नये; तीन, स्पर्धा ही सुद्धा आता कालबाह्य झाली असून ती टाकून तिच्या जागी कालोचित अशी सहकाराची संकल्पना आणली पाहिजे; चार, मुलांकडे, पाळीव प्राणी किंवा यंत्र म्हणून न पाहता एक मनुष्य म्हणून पाहिले पाहिजे; पाच, विद्यार्थ्यांना कमी लेखू नये; सहा, गुणवत्ता महत्त्वाची आहे, क्रमांक किंवा श्रेणी महत्त्वाची असू नये; आणि सात, साकल्याने शिक्षण समजावून घ्यावे आणि मग त्याचे व्यवस्थापन करण्यास शिकावे. एडवर्ड डेनिस हे स्वतः शिक्षक आहेत. ते शिक्षणाविषयी नवीन विचार आत्मसात करून शालेय शिक्षणामध्ये प्रयोग करताहेत. डेविस असेही प्रामाणिकपणे कबूल करताहेत की या सर्व करावयाच्या प्रक्रियांमध्ये ते स्वतःच खूपसे बदलले आहेत. एक शिक्षक या नात्याने त्यांनी आपल्यातच परिवर्तन घडविले आहे; आणि आता ते शिक्षणातील परिवर्तनाची भाषा बोलताहेत. ■■

सामाजिक

# आशा-निराशेच्या चक्रातील चीनमधील भावी पिढी

जागतिकीकरणापासून फायदे करून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या चीनमधील समाजात त्याचे काही बरे-वाईट परिणाम निश्चितपणे होत आहेत.

१९७० च्या दशकात चीनने 'एक कुटुंब एक मूल' हे धोरण स्वीकारले; (बहुधा शहरांमध्ये हे धोरण जास्त कडकपणे व सहजपणे स्वीकारले गेले). त्या काळातील मुले आता तरुण झाली आहेत. पालकांचा पैसा एकाच मुलावर खर्च झाल्याने या तरूण पिढीला चांगल्या विद्यापीठामधील उच्च शिक्षणासह अनेक गोष्टींची संधी मिळाली. विशेषतः शहरांमधील हे सुशिक्षित तरुण आता चांगल्या पगाराच्या नोकऱ्या करून सधन गटात जाऊन बसले आहेत. या तरुणवर्गाच्या हाती अधिक पैसा खेळू लागला आहे आणि त्याच्यातील 'ग्राहक' जागा होत आहे. त्यामुळे मोठ्या शहरांमधील ग्राहकोपयोगी वस्तूंची बाजारपेठ विस्तारत आहे. अत्याधुनिक फॅशनचे कपडे, नावाजलेल्या विविध कंपन्यांच्या वस्तू, मोबाईल फोन आणि शक्य झाल्यास एखादी मोटार या सर्व गोष्टी मिळविणे हे या तरूणांच्या आवाक्यात आले आहे.

इ.स. २००२ मध्ये जेवढे उच्चशिक्षित तरुण विद्यापीठातून बाहेर पडले, त्याच्या दुप्पट संख्येने म्हणजे २८ लाख उच्चशिक्षित विद्यार्थी इ.स. २००४ मध्ये बाहेर पडणार आहेत. त्यापुढील वर्षात ही संख्या ३२ लाखांवर जाईल असा अंदाज आहे. अर्थात, त्यांना नोकऱ्या मिळणे सोपे जाणार नाही; पण तरी एकदा नोकरी मिळाली की या मुलांची ग्राहकवृत्ती वर उफाळून येईल, असा यासंबंधी अभ्यास करणाऱ्या विविध कंपन्यांचा अंदाज आहे. आपल्या कमविण्याच्या क्षमतेवर विश्वास असणारा हा युवकवर्ग खूप बचत करण्याच्या मानसिकतेतही नसतो. त्यामुळे चीनमधील युवकांमध्ये चंगळवाद वाढत असल्याचे चित्र आहे. अलीकडेच चीनमध्ये 'लूनार न्यू ईयर फेस्टिव्हल' झाला. हा तेथील एक महत्त्वाचा कौटुंबिक सण असून यानिमित्त कुटुंबातील ज्येष्ठांनी तरूण पिढीला मोठी भेट देऊन त्यांना सुखसमृद्धी लाभो, असे आशीर्वाद द्यायचे असतात. पाश्चात्य देशांमधील ख्रिसमस किंवा भारतातील दिवाळीसारखे महत्त्व या सणाला असते. यानिमित्त येथील तरूण पिढीला यंदा मिळालेल्या विविध भेटीदेखील त्यांचा ग्राहकवाद गेल्या दोन महिन्यांत पुढे नेण्यास कारणीभूत असू शकतात.

या ग्राहकवादातून आणखी काही बाबी पुढे येत आहेत. शहरी तरुणवर्ग एका अडचणीच्या वळणावर येऊन थांबला आहे. म्हणजे असे की, चीनची संस्कृती आणि साम्यवाद या परंपरागत विचारांमध्ये वाढलेल्या तरुणांना चीनच्या अर्थव्यवस्थेची काळजी वाटते. जागतिकीकरणाच्या या युगात चीनमधील उद्योग पुढे यावेत, असेही त्यांना वाटत असते. त्यामुळे त्यांचा ग्राहकवाद हा त्यांना, चीनमध्ये तयार झालेली ग्राहकोपयोगी वस्तू घेण्यास उद्युक्त करतो; तर दुसरीकडे, पाश्चात्य देशांमधील वेगवेगळ्या फॅशन्सच्या व विविध सोयी असलेल्या ग्राहकोपयोगी वस्तूंनी भरलेली 'शॉपिंग मॉल्स' त्याला आकर्षित करीत असतात. पाश्चात्य देशांशी जवळीक साधण्यासाठी त्यांना इंग्रजी भाषा शिकावीशी वाटते, पण ती शिकणे त्यांना सोपेही जात नाही.

खरे तर, आजचा जगभरातील सुशिक्षित शहरी युवावर्ग जसा कम्प्युटर, मोबाईल फोन आणि क्रेडिट कार्ड व विमानाचा प्रवास याला सरावला आहे, तसाच चीनमधील युवावर्ग देखील त्याला हळूहळू सरावतो आहे. मात्र या सर्व बदलांमध्ये जमवून घेणे त्याला थोडे कठीण जात आहे. कारण, त्यांच्या घरातील ज्येष्ठांची मानसिकता बदललेली नाही. नव्याजुन्या पिढीतील वाद (जनरेशन गॅप) व संघर्ष यांना, तरुणांना सामोरे जावे लागत आहे. असे सर्व असले तरी चीनमधील तरूणांचा मूळ पिंड अद्याप चिनीच आहे. त्याचा कम्प्यूटर हा चिनी कंपनीचाच असतो. या कंपनीचे नाव फक्त चीनपुरतेच मर्यादित असते, त्याचे क्रेडिट कार्ड देखील देशांतर्गत बँकेचेच असते.

चिनी युवकांच्या, या संदर्भातील विचारांबाबत, अलीकडेच एक पाहणी करण्यात आली. त्यानुसार ३५ वर्षाखालील ६३ टक्के नवतरुणांना बऱ्यापैकी इंग्रजी बोलता येतं, तसेच इंग्रजी भाषा येणे म्हणजे यशस्वी होणे, असे सुमारे ८० टक्के युवकांना वाटते. चिनी कंपनीच्या वस्तू घेणाऱ्यांचे प्रमाण ५३ ते ५५ टक्के आहे, मात्र जागतिक दर्जाची व बहुराष्ट्रीय किंवा परकीय कंपन्यांची उत्पादने घेणे आवडू शकणाऱ्या गटात ७२ ते ७५ टक्के युवक मोडतात. याच वयोगटातील सुमारे ७५ टक्के युवकांचे संगणक ज्ञान चांगले असून ते सतत इंटरनेटही वापरत असतात.

चीनमध्ये प्रथमच, गेल्या वर्षाअखेरीस सौंदर्यस्पर्धाही झाली. त्यावेळी केलेल्या पाहणीत देखील असे आढळले की, चीनमध्ये ग्राहकवाद व चंगळवाद वाढत असून युवापिढी एका वेगळ्या सांस्कृतिक बदलाला सामोरी जात आहे. घटस्फोटाचे प्रमाण येथे वाढत असून जुन्या मूल्यांना धक्के पोचत आहेत. येथील मध्यमवर्ग वाढत असून तो 'माओ'ला दूर सारून जागतिकीकरणाचे फायदे मिळविण्यास उत्सुक आहे.

## ग्रामीण भागात मात्र वेगळे चित्र

समृद्धीच्या वाटेवर असलेल्या या तरुण मुलामुलींची ही एक शहरी पिढी आहे; तर दुसरीकडे, ग्रामीण भागात बेरोजगारी व गरिबीच्या चक्रात अडकलेली युवापिढी आहे. जागतिकीकरण, चंगळवाद, उच्च शिक्षण व नोकऱ्या या सर्वांपासून दूर असलेल्या या तरुणांना, शहरी तरुणांच्या बरोबरीस येण्यासाठी अनेक वर्षे लागतील, अशी स्थिती आहे. चीनमध्ये काही प्रांतातील काही मोजक्या शहरांमध्येच जागतिकीकरणाचे फायदे पोचत आहेत. ग्रामीण भागातील बहुसंख्य युवा नागरिकांचा ओघ आता नोकरीच्या शोधार्थ शहरांकडे वाढतो आहे. त्यामुळे शहरीकरणाला वेग आला असून शहरांमधील गरीब वर्गही वाढतो आहे.

चीनच्या ईशान्य भागात तर ही स्थिती आणखीनच वाईट आहे. या भागाची लोकसंख्या १० कोटी ७ लाखांवर आहे (फ्रान्स व स्पेन या दोन देशांच्या एकत्रित लोकसंख्येएवढी). १९९७ ते २००२ या काळात चीनमध्ये सरकारच्या अखत्यारीतील अनेक कंपन्यांमधील कामगारांच्या नोकऱ्या गेल्या. त्या २० लाखावर कामगारांपैकी एक चतुर्थांश कामगार या भागात राहतात. आजही येथे हजारो-लाखो बेरोजगार आहेत. एक किंवा दोन खोल्यांची आणि विटांनी बांधलेली घरे येथे सर्वत्र दिसतात. जागतिकीकरण किंवा शहरांमधील सुविधांचे वारे येथे पोचलेले नाही. गरिबी मात्र वाढतेच आहे. माओच्या काळात गरीब नागरिकांच्या आरोग्याची काळजी सरकारच्या अखत्यारीतील उद्योगसमूह घेत असत. आता या नागरिकांना कोणी वाली नाही.

## अनाथ मुलांची वाढती संख्या

अलीकडेच चीनमध्ये युवावर्गाशी अप्रत्यक्षपणे संबंध येऊ शकेल अशी आणखी एक घटना घडते आहे. ती म्हणजे, ग्रामीण भागातील शाळा व घर सोडून, शहरात विविध प्रकारचे छोटे गुन्हे करणाऱ्या पौगंडावस्थेतील अनाथ मुलामुलींची संख्या वाढते आहे, ही तेथे एक काळजीची बाब झाली आहे. या अनाथ मुलामुलींना शिक्षण, वसतीगृहे व उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध झाली नाहीत, तर ती आणखी गंभीर गुन्ह्यांकडे वळण्याचीच शक्यता जास्त आहे. म्हणजे नजीकच्या भविष्यातील ही तरुण पिढी तुरूंगात असेल, अशी भीती आता व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या दशकात अशा मुलांची संख्या एक लाखावरून दीड लाखावर गेली आहे, मात्र अनधिकृतरीत्या ती चार ते सहा लाख असावी, असा यासंबंधीच्या अभ्यासकांचा अंदाज आहे.

असे घडण्याला काही कारणे आहेत. चीनने साम्यवादी धोरणे बाजूला ठेवून भांडवलशाहीकडे जाणाऱ्या जागतिकीकरणाचा व खुल्या अर्थव्यवस्थेच्या मार्गाकडे जाण्याचा पर्याय काही प्रमाणात तरी स्वीकारला. त्याचा वाईट परिणाम समाजातील काही घटकांवर झाला. जे घटक आधीच वंचित होते त्यांना जागतिकीकरणाचा कोणताही लाभ अद्याप मिळालेला नाही. (भविष्यातही तो कितपत मिळू शकेल, याबद्दल चीन, भारत व इतर अनेक देशांमधील अभ्यासक साशंक आहेत !) या घटकातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर नोकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना विविध कारणांमुळे त्यांच्या जमिनींना मुकावे लागले आहे. त्यातच कौटुंबिक समस्याही निर्माण होत आहेत. साम्यवादी राजवटीत गरीब नागरिकांच्या शिक्षणाची व आरोग्याची काळजी सरकारतर्फे घेण्यात येत होती. तसेच, तेव्हा साम्यवादी पक्षाच्या शहर व गावपातळीवरील समित्यांकडे कौटुंबिक समस्या सोडविण्याची जबाबदारी होती. आता तसे राहिले नाही. त्यामुळे या घटकातील मुलांना शिक्षण घेता येत नाही आणि गरिबीमुळे कुटुंबातील वातावरण बिघडत चालले आहे. यामुळे शाळांमधील गळतीचे प्रमाण वाढले आहे. या सामाजिक परिस्थितीत रेल्वे स्थानकावर हिंडणाऱ्या व शहरात वाईट मार्गाने पैसे मिळविणाऱ्या बालगुन्हेगारांच्या संख्येत वाढ झाली आहे.

अशा अनाथ मुलांसाठी वसतीगृहे, शाळा व ग्रंथालये अशा काही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पण या मुलांचा प्रश्न वेगळाच आहे. या सुविधा मिळाल्या तरी त्यांची मने भावनाशून्य झाली आहेत. अशा संस्थेतील कर्मचाऱ्यांवर विश्वास ठेवण्याची त्यांची तयारीच नसते. असे असले तरी सरकारने अलीकडेच या परिस्थितीवर उत्तर शोधण्यासाठी कायद्याचा आधार घेतला आहे. विविध शहरांमधील प्रशासनाने बालसुधारगृहांची स्थापना करण्याचे बंधन त्यांच्यावर कायद्याने घालण्यात आले आहे. बालकांवर होणारे विविध अत्याचार त्वरित थांबविण्यासाठी सर्वप्रकारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

'बालकांना गुन्हेगार होण्यापासून वाचवायचे असेल तर 'बालहक्क' त्यांना मिळतील याची काळजी घेणे गरजेचे आहे,' असे मत बालहक्कांच्या संदर्भात काम करणाऱ्या वकिलाने व्यक्त केले आहे. चीनमधील सध्याची पिढी व भावी पिढी ही आशा-निराशेच्या चक्रात अडकली आहे, हे मात्र खरे !

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., २७ नोव्हेंबर २००३, १९ फेब्रुवारी २००४, द इकॉनॉमिस्ट - १० जानेवारी २००४, न्यूयॉर्क टाइम्स ३ जानेवारी २००४, इंटरनेट)* ■■

क्रीडा

# सिंगापूरचे क्रीडा-स्वप्न

सिंगापूरमधील शिक्षण इतर अनेक ठिकाणांपेक्षा फारसे वेगळे नाही. मुले अभ्यास एके अभ्यास करतात, जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी धडपडतात आणि शाळाबाह्य सारा वेळ परीक्षांच्या तयारीसाठी दवडतात. अशा शाळांतून खेळाला नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. त्यामुळे, चांगले खेळाडू घडविण्याकडे आणि ऑलिंपिकमध्ये पदके मिळविण्याकडे सिंगापूरने फारसे लक्ष दिलेले नाही.

पण, आता हे सारे बदलते आहे. थोड्याच वर्षांमध्ये खेळाच्या विश्वात सिंगापूर हा एक नवा तारा चमकण्याच्या तयारीत आहे. जागतिक दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी एक जंगी प्रकल्प - स्पोर्टस् ॲकेडमी - सुमारे साडे सात कोटी सिंगापूर डॉलर्स (साडे चार कोटी अमेरिकन डॉलर्स) खर्चून, नुकतीच, जानेवारी २००४ मध्ये उभी राहिली आहे. येथे ऑलिंपिक दर्जाचे दोन पोहोण्याचे तलाव आहेत. दहा बॅडमिंटन कोर्टस् आहेत, एक सिंथेटिक फुटबॉल मैदान आहे, आणि धावण्यासाठी ४०० मीटर्सचा रबर ट्रॅक आहे. शिवाय सातशे लोक बसू शकतील असे विविध खेळांचे सभागृहही आहे.

'शालेय शिक्षण आणि खेळ या दोन गोष्टी परस्परांबरोबर जात नाहीत, अशीच श्रद्धा असणारा हा देश आहे,' असे या नव्या क्रीडाविद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा-मानसतज्ज्ञ, कॅनडामधून आलेले पीटर अहोर यांनी म्हटले आहे. पण, सरकारी प्रयत्नांमधून समाज आता या मानसिकतेतून बाहेर पडेल अशी चिन्हे आहेत.

सप्टेंबर २००० मध्ये, सिंगापूरमध्ये चांगले खेळाडू तयार करणे आणि क्रीडा व्यवसायाला चालना देणे यासाठी शिफारसी करण्याकरिता एक शासकीय समिती गठित करण्यात आली. वर्षभरात या समितीने आपला अहवाल तयार केला, आणि एक वेगळाच मुद्दा पुढे आणला. 'सिंगापूरमधील विविध वांशिक गटांमध्ये एकोपा निर्माण करण्यात खेळांचे स्थान मोठे असू शकते,' असे या समितीने म्हटले. पण एवढेच नाही. समितीला असे वाटते की, 'लोक खेळांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत गेले तर त्यांतून 'संवेदनशील माणूस' घडेल; चिकाटी, शिस्त, एकाग्रता, गटकार्य, कल्पकता आणि आपण उत्तम कामगिरी करावी अशी भावना या सर्व गुणांची जोपासना होते.' याशिवाय एक आर्थिक दृष्टिकोणही आहे.

आजवर गेली सतरा-अठरा वर्षे सिंगापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकारी आहे. आणि खेळांत गुंतवणूक केली की उत्पन्नात मोठी उलाढाल होऊ शकणार आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या अर्धा टक्के म्हणजे ६८ कोटी सिंगापूर डॉलर्स इतके उत्पन्न खेळांच्या क्षेत्रांतून अपेक्षित आहे. २०१० सालापर्यंत ही रक्कम १४ अब्ज डॉलर्सवर जाण्याची अपेक्षा आहे.

एक मुद्दा राष्ट्रीय अभिमानाचा, प्रतिष्ठेचाही आहे. गेल्या वर्षी पुसान येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत सिंगापूरने, दक्षिण कोरियाच्या बरोबरीने, म्हणजे पाच सुवर्णपदके जिंकली आहेत.(२ रौप्य आणि १० कांस्यपदकासहित) तरीही अजून सुधारणेला वाव आहे, कितीतरी मजल मारायची आहे, केवळ दक्षिण आशिया किंवा आशियाच्या स्तरावर नव्हे तर जागतिक स्तरावर कर्तृत्व गाजवायचे आहे, असे तेथील संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. सिडने येथे झालेल्या २००० सालच्या ऑलिंपिकमध्ये सिंगापूरला एकही पदक प्राप्त झालेले नाही. मात्र, तेवढ्याच लोकसंख्येच्या जमैका, न्यूझीलंड, नॉर्वे या देशांनी मात्र अनेक पदके मिळविली आहेत. त्यामुळे सिंगापूरवासियांच्या मनात याची खंत आहे.

सिंगापूरने आता मागे पाहायचे नाही, असे ठरविलेले दिसते. त्यांनी प्रत्येक खेळासाठी बाहेरच्या जगातून उच्च दर्जाचे क्रीडाशिक्षक आणले आहेत. उदाहरणार्थ, पोहणे आणि नेटबॉलसाठी ऑस्ट्रेलियातून, टेबलटेनिससाठी चीनमधून, बॅडमिंटनसाठी इंडोनेशियातून, फुटबॉलसाठी इंग्लंडमधून आणि ॲथलेटिक्ससाठी जर्मनीमधून तज्ज्ञ मार्गदर्शक आणले आहेत. एवढी सारी जंगी तयारी केल्यानंतर येत्या चार वर्षांतच याची फळे मिळू लागतील, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. अर्थात, हे विधान तसे धाष्ट्र्याचेच आहे. कारण, सिंगापूरमधील हे पहिलेच क्रीडामहाविद्यालय. तेही एवढ्यातच सुरू झालेले. पण, मलेशियात अशी दोन, थायलंडमध्ये तेरा तर चीनमध्ये शेकडो क्रीडा विद्यालये आहेत. शिवाय, सिंगापूरच्या या विद्यालयात आज तरी केवळ १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. (ही निवड १२०३ विद्यार्थ्यांमधून करण्यात आली आहे !) येत्या तीन वर्षांत ही संख्या ६०० पर्यंत जाईल.

या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडाविद्यालयात फी मात्र बरीच आकारली जाते. दरसाल २५ हजार सिंगापूर डॉलर्स इतकी फी आहे. पण सरकारने यासाठी सहाय्य दिल्यामुळे प्रत्यक्षात विद्यार्थ्याला केवळ ६ हजार डॉलर्स भरावे लागतात. त्यातही त्यांनी शिष्यवृत्ती मिळविली तर ही फी ३ ते ४ हजार डॉलर्सपर्यंत खाली येते. विद्यालयाने

अशा पन्नास शिष्यवृत्या दिल्या आहेत. आता काही कंपन्याही अशा सहाय्यासाठी पुढे सरसावल्या आहेत. वेगवेगळ्या खेळांच्या मार्गदर्शकांना सहाय्य करण्यासाठी, क्रीडा-शास्त्रज्ञांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

मुलांची पोषणाची गरज भागते की नाही, व्यवस्थित प्रगती होत आहे की नाही वगैरे गोष्टींवर लक्ष ठेवण्याचे काम ही शास्त्रज्ञ मंडळी करणार आहेत. क्रीडा मानसशास्त्र, शरीरोपचार, आरोग्य, आहार अशी एक ना अनेक अनुषंगिक कामांची येथे नीट आखणी करण्यात आली आहे. त्यासाठी तज्ज्ञांची मदतही घेतली जात आहे. मुले खेळांचे सारे शास्त्र कोळून प्यायलेली असतील, असे या विद्यालयाच्या क्रीडा विज्ञान ॲकेडमीचे व्यवस्थापक गोपिनाथन नायर यांनी म्हटले आहे.

या विद्यालयात नव्यानेच प्रवेश केलेली मुले मात्र अगदी खूष आहेत. तसे वेळापत्रक फार कडकपणे अंमलांत आणले जाते, पण मुलांच्या शरीरांबरोबरच मनांचीही काळजी घेतली जाते आणि नुसते हडेलहप्पी किंवा नुसते पोपटपंची ज्ञान येथे नाही. कौशल्य, काळजी आणि ज्ञान यांचा चांगला मिलाफ करण्याचा येथे प्रयत्न आहे. त्यामुळे दहा-बारा वर्षांचे इथले विद्यार्थी मोठ्या यशाची स्वप्ने आजच पाहू लागले आहेत. त्यांची महत्त्वाकांक्षाही येथे जोपासली जात आहे.

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर.)*

## माझा मार्क्सवाद

" पिळवणुकीविरूद्धच्या संघटित व प्रभावी लढ्याचा सर्वश्रेष्ठ अर्वाचीन प्रवर्तक म्हणून मी मार्क्सला मानतो. जोपर्यंत आपल्या लोकशाहीत जमीनदार-निर्मित सशस्त्र सेनेकडून अनेक भूमिहीन शेतमजुरांना कुटुंबासह कोंडून गोळ्या घालून ठार मारण्यात येते, धनदांडग्या राष्ट्रांची आर्थिक साम्राज्ये त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून अप्रगत राष्ट्रतील जनतेची शिष्टसंमत लूटमार करीत राहतात आणि राष्ट्रांतर्गत आर्थिक नियोजनाचा दृश्य परिणाम झोपडपट्टीतील अर्धनग्न पोरांपर्यंत पोचलेला मला दिसत नाही, तोपर्यंत माझा मार्क्सवाद इतिहासजमा होणार नाही; तसेच जोपर्यंत समाजातील हिंसाचार व भ्रष्टाचार सतत वाढती आहे आणि आपल्या समाजातील सुशिक्षित व कर्तबगार वर्ग आपल्या आचरणातून आत्यंतिक व्यक्तिवाद, संपत्तीची अधिकाधिक हाव, चैनबाजी, वशिलेबाजी व मूल्यहीनता यांचाच आदर्श सामान्य जनतेपुढे ठेवीत आहे, तोपर्यंत माझा गांधीवादही इतिहासजमा होणार नाही."

**विंदा करंदीकर**

आरोग्य

# भारतात औषधांच्या चाचण्यांचा वाढता व्यापार

जागतिकीकरणाचा पसारा हळूहळू अनेक देशांमध्ये वाढतो आहे. देशांतर्गत, काही क्षेत्रांसाठी तो त्रासाचा ठरतो आहे, तर काहींसाठी फायद्याचा. त्यातच माहिती-तंत्रज्ञानाशी संबंधित विविध सोयींनी व संशोधनांनी, जागतिकीकरणाला प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करण्याला मुक्त परवानाच जणू मिळवून दिला आहे. आता, ग्राहकोपयोगी वस्तू, विविध सेवा आणि तत्सम अनेक क्षेत्रांत 'जागतिकीकरण' आले आहे.

या जागतिकीकरणातून, भारतात स्थिरावलेले संगणक क्षेत्रातील 'आऊटसोर्सिंग' अनेकांच्या परिचयाचे झाले आहे. आता वैद्यकीय क्षेत्रात म्हणजे औषधांच्या चाचण्यांमध्ये देखील 'आऊटसोर्सिंग'ला महत्त्व आले आहे. परदेशांमधील औषध उत्पादक कंपन्या, आपल्या औषधांच्या मोठ्या प्रमाणावर चाचण्या करवून घेण्यासाठी, भारतातील कंपन्यांवर व रुग्णांवर अवलंबून राहताहेत. याचे कारण, या चाचण्या त्यांच्या स्वतःच्या देशात करण्यापेक्षा, भारतात करवून घेताना त्यांचा वेळ व खर्च वाचतो आहे. त्यामुळे अलीकडे, भारतात, विविध औषधांच्या चाचण्या करणाऱ्या स्थानिक संशोधन कंपन्यांची (Clinical research firms) संख्या हळूहळू वाढत असून, हा एक नवा उद्योग म्हणून आकाराला येतो आहे. मात्र भारताने या संदर्भात सावधगिरी बाळगणे अत्यावश्यक आहे, कारण हा व्यापार येथील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे.

कोणत्याही औषध कंपनीला कोणत्याही रोगावरचे औषध तयार करताना काही विशिष्ट टप्पे पार पाडावे लागतात. पहिल्या टप्प्यात प्रयोगशाळेत, विविध शास्त्रांच्या अनेक चाचण्यांमधून बाहेर पडल्यानंतर या औषधांची चाचणी प्रथम प्राण्यांवर करण्यात येते. प्राण्यांवर कोणताही विपरित परिणाम आढळला नाही, तर दुसऱ्या टप्प्यात, अतिशय कमी प्रमाणात ती चाचणी काही रुग्णांवर किंवा कधी सामान्य व्यक्तींवरही करण्यात येते. या रुग्णांना जर औषधांचा उपयोग झाला तर थोड्या मोठ्या प्रमाणावर ती इतर रुग्णांवर करण्यात येते. याही रुग्णांना औषधाने बरे वाटले तर तिसऱ्या टप्प्यात, आणखी मोठ्या प्रमाणावर त्याची चाचणी करण्यात येते; मग चौथ्या टप्प्यात, औषधांशी संबंधित इतर आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय संस्था यांच्या तपासणीतून, त्यांच्या आरोग्यविषयक नियमांचे व इतर कडक नियमनांचे पालन करून आणि कागदोपत्री

अनेक बाबी पूर्ण केल्यानंतर ते औषध बाजारात येऊ शकते. यापैकी पहिल्या दोन टप्प्यांचे काम परदेशांमध्ये सहजपणे होऊ शकते. तेथे अतिशय सुसज्ज प्रयोगशाळा असतात; व नवनवीन तंत्रज्ञान आणि संशोधन यांचा मेळ उत्तमरीत्या घालण्यात येतो. मात्र तिसऱ्या टप्प्याची चाचणी करण्यासाठी तेथे अडचणी येतात.

कारण, एकतर तेथे अशा रुग्णांना गाठण्यासाठी खूपच वेळ द्यावा लागतो आणि गाठल्यानंतर चाचण्यांशी संबंधित प्रक्रियेसाठी खर्चही बराच येतो. दुसरे म्हणजे, काही रोगांचे रुग्ण तेथे मोठ्या संख्येने मिळतीलच असेही नाही, (दुर्दैवाने भारतात सर्व प्रकारचे रोगी मिळतात). मिळाले तरी त्यांनी कोणते ना कोणते औषध पूर्वीपासून घेतलेले असते, त्यामुळे नव्या औषधाची चाचणी करताना जुन्या औषधांचाही परिणाम त्यांच्यावर झालेला असतो. त्यामुळे नव्या औषधाची चाचणी नीटपणे होईलच याची खात्री त्यांना देता येत नाही. यामुळे औषध कंपन्यांना या टप्प्यावर भारतासारख्या देशांची मदत घेणे सोयीचे ठरते. चाचण्या करण्यासाठी रुग्णांना आर्थिक मोबदलाही या कंपन्यांना द्यावा लागतो. परदेशांत असा मोबदला देणे हे भारताच्या तुलनेने महागच ठरते. भारतातील गरिबी व लोकसंख्या हे मुद्दे ध्यानात घेतल्यास, आर्थिक मोबदल्यासाठीही अनेक रुग्ण चाचण्यांसाठी उपलब्ध होऊ शकतात. आणखी एक महत्त्वाचे असे की, औषधांच्या चाचण्यांच्या संदर्भात वांशिक भिन्नतेचा मुद्दाही विचारात घ्यावा लागतो. एखाद्या औषधाचे एका वंशावर (उदाहरणार्थ - चीनमधील हॅनवंशीय किंवा युरोपमधील गौरवर्णीय) जे चांगले वा वाईट परिणाम होतात; तसेच परिणाम दुसऱ्या वंशावर होतीलच असे नाही. त्यामुळे भिन्नभिन्न वंशाच्या लोकांवर अशा चाचण्या कराव्या लागतात. भारत यादृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो.

शिवाय भारतात इंग्रजी भाषा जाणणारा डॉक्टरवर्ग व नर्सेस आहेत, संगणक जाणणारा तरूण वर्ग आहे; त्यामुळे संशोधनाचे काम हे या सर्वांच्या मदतीने वेगाने होऊ शकते. डॉक्टर्स व नर्सेस यासंबंधीची रुग्णांना द्यायची माहिती स्थानिक भाषेतून देऊ शकतात व त्यांची कागदपत्रेही स्थानिक भाषेतून भरून घेऊ शकतात, आणि प्रत्यक्ष चाचणीचे काम इंग्रजी भाषेतून या परकीय कंपन्यांना करून देऊ शकतात. येथे, पाश्चात्य जीवनपद्धतीशी संबंध दर्शविणारे मधुमेह, कॅन्सर व हृदयविकारासारखे रोगही आढळतात; तर टी.बी.,मलेरिया, डायरिया यांचेही रूग्ण आढळतात. आणि भारतात औषधांच्या चाचण्यांसाठी रुग्णांना जमविणे अवघड नाही. उदाहरणार्थ, मानेच्या कॅन्सरच्या औषधांच्या चाचणीसाठी 'म्युको फार्मा' या जर्मन कंपनीला किमान ७५०

रुग्णांची नोंदणी करायची होती. त्यांनी मुंबईतील 'सायरो क्लिनफार्म' (SIRO Clinpharm) या संशोधन कंपनीकडे यासंबंधी विचारणा केल्यानंतर केवळ दीड वर्षांच्या आत आणि फक्त पाच हॉस्पिटल्समधून त्यांना ६५० रुग्णांची नोंदणी करता आली. उरलेले १०० रुग्ण युरोपमध्ये मिळविण्यासाठी दुप्पट वेळ खर्च करावा लागला आणि किमान २२ ते २४ हॉस्पिटल्सशी संपर्क साधावा लागला. तसेच, भारतात विशिष्ट रोगावर, फारशी औषधे न घेतलेल्या किंवा कोणतेही औषध न घेतलेल्या रुग्णांची संख्याही बरीच आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेतील एका कंपनीला ब्रेस्ट कॅन्सरवरील नवीन औषधाची चाचणी घ्यायची होती. तेव्हा या रोगावर सर्वात पहिल्या टप्प्यावर घेण्यासाठी मान्यताप्राप्त असलेले 'टॅमोक्सिफेन' हे औषध न घेतलेला एकही रुग्ण त्यांना अमेरिकेत मिळू शकला नाही; तर 'क्लिनफार्म'ने त्यांना भारतात, हे औषध न घेतलेले असे कित्येक रुग्ण शोधून दिले.

असे असले तरी, औषधांच्या चाचण्या हा विषय भारतात नवा नाही. यापूर्वीही भारतात औषधांच्या चाचण्या झालेल्या आहेत. मात्र या चाचण्या भारतीय बाजारपेठेत नवीन औषधाची विक्री करायची असल्यास, येथील व्यवस्थेचा भाग म्हणून करण्यात आल्या होत्या. त्याला 'जागतिक पातळीवरील संशोधन', असा संदर्भ नव्हता. आता मात्र हा संदर्भ भारतात येऊ लागला आहे. ॲस्ट्रा झेनेका या कंपनीने लाखो रुपये खर्च करून टी.बी. वर औषधोपचार करण्यासाठी बंगलोरमध्ये संशोधन केंद्र उघडले आहे. फायझर या कंपनीने मुंबईत संशोधन केंद्र व त्यासंबंधीचे प्रशिक्षण देण्याचे ठरविले आहे. झायडल कॅडिला, ब्रिस्टॉल मायर्स आणि नोवो नॉरडिस्क या कंपन्यांनी देखील भारतात असा व्यापार वाढविण्याचे ठरविले आहे.

हा चाचण्यांचा व संशोधनाचा व्यापार वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे, भारताने पेटंटच्या कायद्यात, जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांप्रमाणे बदल करण्याची तयारी दर्शविली आहे. अमेरिकेतील पेटंटच्या कायद्यानुसार एखाद्या नवीन औषधावर कंपनीला पेटंट मिळविता येते आणि त्यावर किमान १० वर्षांसाठी नफा मिळविता येतो. त्यानंतर तेथील उद्योजकाला स्पर्धेला सामोरे जावे लागते. तर, भारतात, औषधांचे पेटंट मिळविता येत नाही; पण औषध तयार करण्याच्या प्रक्रियेचे पेटंट मिळविता येते, त्यामुळे तेच औषध दुसऱ्या पद्धतीने तयार करण्यात आले, तर त्या औषधाच्या कंपनीला लगेचच स्पर्धेला सामोरे जावे लागते व त्या औषधावर नफा मिळविण्याच्या त्यांच्या शक्यता कमी होतात. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांप्रमाणे, पेटंटच्या

कायद्यात २००५ पर्यंत दुरुस्त्या करायच्या आहेत. भारताने या कायद्यात व्यापार व संशोधन वाढीस योग्य असे बदल केले तर भारतात अमेरिका व युरोपमधील अनेक औषध कंपन्या संशोधनासाठी येण्यास उत्सुक असतील. औषध कंपन्यांचे संशोधन केंद्र म्हणून भारतात हा व्यापार कितपत जोमाने वाढेल हे मात्र, भारताच्या पेटंट संबंधीच्या कायद्यात कोणते बदल करण्यात येतात, त्यावर अवलंबून राहणार आहे.

## भारताने सावधगिरी बाळगणे आवश्यक


आऊटसोर्सिंगचा हा व्यापार भारताला आर्थिकदृष्ट्या फायद्याचा ठरूही शकेल; पण तरीही भारताने याप्रकरणी अतिशय सावधगिरीने पावले उचलण्याची गरज आहे. कारण, या चाचण्यांच्या आऊटसोर्सिंगची आणखीही एक वेगळी पण महत्त्वाची बाजू आहे आणि ती भारतातील रूग्णांच्या आरोग्याशी निगडित आहे. भारतातील संगणक क्षेत्रातील आऊटसोर्सिंगविरूद्ध अमेरिकेतील नागरिकांनी ओरड केली असली तरी या आऊटसोर्सिंगविरूद्ध भारतातील नागरिकच ओरड करण्याची शक्यता जास्त आहे. कारण, या चाचण्यांसाठी रुग्ण शोधताना त्यांना याची संपूर्ण माहिती देऊन त्यांची परवानगी घेण्यात येत असली तरी रुग्ण दगावण्याची किंवा त्याच्या आरोग्यविषयक इतर बाबींवर या औषधाचा बरा-वाईट परिणाम होण्याची शक्यता असतेच. आणि सध्यातरी या रुग्णांच्या मदतीसाठी भारतात कायदे नाहीत.

अलीकडेच, मार्च महिन्यात, सर्वोच्च न्यायालयात एका स्वेच्छाकार्य संस्थेने अशी एक याचिका दाखल केली आहे. हैदराबाद येथील शांता बायोटेक्निक्सविरूद्ध दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत असे म्हणण्यात आले आहे की, या संस्थेने स्ट्रेप्टोकायनेस या औषधाची चाचणी ज्या आठ रुग्णांवर केली ते आठ रुग्ण या औषधामुळे दगावले. या रूग्णांच्या नातेवाईकांना कोणतीही नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. उलट, या औषधाने रुग्ण दगावलेच नाहीत, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. यापूर्वी केरळमध्येही अशीच एक घटना घडली होती; तेथे, 'रिजनल कॅन्सर सेंटर'ने एका रसायनची चाचणी काही रुग्णांवर घेतली होती. तेव्हा दोन रूग्ण दगावले होते. अर्थात, शांता बायोटेक्निक्सने 'डीसीजीआय'ची (ड्रग्ज कंट्रोलर जनरल इंडिया) परवानगी घेतली होती व केरळमध्ये तशी परवानगी घेण्यात आली नव्हती, हा भाग आहेच. 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आय.सी.एम.आर.)यांच्यातर्फे अशा चाचण्यांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे वा आचारसंहिता आखण्यात आली आहे. पण त्यानुसार या चाचण्या होतीलच, अशी यंत्रणा मात्र भारतात नाही. उदाहरणार्थ,

'आय.सी.एम.आर.'ने म्हटले आहे की, चाचण्यांना मान्यता देणाऱ्या रुग्णांना त्यांच्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य शारीरिक व मानसिक परिणामांची वा तत्संबंधी धोक्यांची पूर्ण कल्पना देण्यात आली पाहिजे. याशिवाय भारतात लाखो फिजिशियन्स असले, तरी अशा चाचण्या करण्यासाठी जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त दर्जाचे आवश्यक असलेले नैपुण्य वा विशेष ज्ञान त्यांना असतेच असे नाही, असे खुद्द वैद्यकीय क्षेत्रांतील जाणकारच म्हणतात. शिवाय भारतात, हॉस्पिटल्समधील 'नीतीमत्ता समित्यां'कडून अशा चाचण्यांचे सोयीस्कर निष्कर्ष मिळविणेही अवघड नाही, असेही म्हटले जाते. या संदर्भात खालील उदाहरण बोलके आहे.

एका खाजगी हॉस्पिटलमध्ये गर्भधारणेच्या संबंधी विविध तपासण्या करून घेण्यासांठी आलेल्या काही स्त्री रुग्णांना एक विशिष्ट औषध (कॅन्सरच्या रूग्णांना देण्यात येणारे लिट्रोझोल नावाचे औषध) देण्यात आले होते. या औषधाने स्त्रीबीज तयार होण्याच्या काळात (Ovulation) काही चांगला परिणाम होतो किंवा कसे हे तपासायचे होते. पण खरे म्हणजे या औषधाची अल्प मात्राही गर्भाच्या वाढीवर विपरित परिणाम करणारी ठरू शकते आणि अमेरिकेच्या औषध विभागाने तशी नोंद त्या औषधावर असणे बंधनकारक आहे, असेही म्हटले आहे. तरीही भारतात अशी बेकायदेशीर चाचणी ४०० स्त्री रुग्णांवर झाली. कारण रुग्णांच्या बाजूने असा कोणता कायदा नाही आणि संबंधित संस्थांवर बंधन नाही व त्यांच्यावर कारवाई देखील होत नाही.

चाचण्या करताना रुग्णांना नुकसानभरपाई (आर्थिक मोबदल्याशिवाय) मिळण्याची सोय असणेही अपेक्षित आहे आणि त्याचा अर्थ रुग्ण दगावल्यासच रुग्णाच्या नातेवाईकांना पैसा मिळणे, असाच फक्त नाही, तर चाचणी करण्यात आलेले रुग्ण दगावू नयेत किंवा त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ नये यासाठी त्वरित योग्य ते उपचार मोफत वा अत्यल्प खर्चात करण्यात येतील अशी सोय हवी, असे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे. आणि समजा परदेशांमधील कंपनी अशा चाचण्या करवून घेत असेल, तर त्या कंपनीने, आपल्या देशात द्यावी लागणारी नुकसानभरपाई द्यायची की, ज्या देशांतील रुग्णांवर चाचणी करण्यात येते आहे तेथील आर्थिक -सामाजिक परिस्थितीनुसार नुकसानभरपाई द्यायची ? हे देखील आधीच ठरलेले असले पाहिजे. अलीकडे मात्र कंपनीने रुग्णांचा विमा उतरविण्याचे काम केले पाहिजे, असेही बंधन असल्याचे समजते. एकंदरीत हे आऊटसोर्सिंग कितपत योग्य ठरेल, याचा विचार सर्वांनीच करायला हवा आहे. *(संदर्भ - एफ.ई.ई.आर., इकॉनॉमिक टाइम्स, इंटरनेट)* ■■



# शांततेच्या पाऊलखुणा

## 'युद्धविरोधी योद्धा' !

योद्ध्याचे काम हे लढण्याचे, लढाईत विजय मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्याचे ! मेजर डेव्हिड लास्ट हे अशाच गटात मोडणारे ! अजूनही त्यांचा लढा चालूच आहे; मात्र हा लढा आहे तो शांततेसाठी ! 'युद्धविरोधी योद्धा' या शब्दात त्यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात येतो, ही त्यांच्या शांततेच्या कार्याची पावतीच आहे.

ऑस्ट्रेलियात जन्मलेले डेव्हिड लास्ट आपल्या पालकांबरोबर इंग्लंडमध्ये आले. एडिनबर्ग येथे ते लहानाचे मोठे झाले. यानंतर त्यांच्या पालकांनी कॅनडात स्थलांतर केले. प्रथम एक कॅडेट, त्यानंतर १९७७ मध्ये अधिकारी पदाचे प्रशिक्षण घेण्यासाठी ते लष्करात भरती झाले. यानंतर त्यांनी रॉयल मिलिटरी कॉलेज येथे 'कॉन्फ्लिक्ट मॅनेजमेंट'(संघर्षातील व्यवस्थापन) या विषयात उच्च पदवी मिळविली. यानंतर राज्यशास्त्र या विषयात त्यांनी पी.एच.डी. मिळविली. 'देशांचा विकास व सुरक्षा' यांमधील संबंधाचा अभ्यास करण्याचे त्यांनी ठरविले होते.

यापूर्वी, 'उत्तर विरूद्ध दक्षिण' (श्रीमंत विरूद्ध गरीब) अशी झालेली जगाची विभागणी आणि त्याचा 'विकास व सुरक्षा' या विषयांशी असलेला संबंध, विली ब्रॅन्ट यांनी पुढे आणला होता. देशांचा विकास व सुरक्षा यांचा परस्परसंबंध असतो, ही बाब लास्ट यांनी पुढे आणली असती, तर त्याचा विविध देशांच्या परराष्ट्रीय धोरणांवर परिणाम झाला असता आणि शस्त्रास्त्रस्पर्धेऐवजी विकासाच्या प्रश्नाकडे निधीचा ओघ वळला असता. ब्रिटन, जर्मनी आणि ओटावा या त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी त्यांनी या विषयाचा व विविध आकडेवारीचा भरपूर अभ्यास केला आणि ब्रॅन्ट यांच्या मताशी आपली सहमती दर्शविली. एखाद्या देशाचा वाढीचा दर (ग्रोथ रेट) जर वाढता असेल तर तो देश शत्रुत्वाकडे अत्यल्प प्रमाणात झुकतो, असे त्यांना आढळले. अर्थात याबाबतीत सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडतेच असे नाही. आर्थिक व सामाजिक विकासाच्या वेगवेगळ्या स्तरांवरील वेगवेगळ्या पद्धती यांचाही शत्रुत्वाच्या भूमिकेवर परिणाम होत असतो. फार मोठ्या प्रमाणावर लष्कराचा विकास हा देखील शत्रुत्वाचे प्रमाण वाढविण्यास कारणीभूत ठरू शकतो, असे लास्ट यांना वाटले.

लास्ट यांना १९८९ मध्ये पी.एच.डी मिळाली आणि त्याच वर्षी मेजर पदावर त्यांची पदोन्नती झाली. मात्र त्यांचा प्रबंध त्यांनी प्रसिद्ध केला नाही. याचवेळी त्यांच्या नोकरीच्या कामात त्यांना कॅनडासाठी शस्त्रास्त्रे विकत घेण्याचे काम करायचे होते. शीतयुद्ध संपल्यामुळे शस्त्रास्त्रे घेणे सयुक्तिक ठरणार नाही, असे लास्ट यांचे मत होते. त्यामुळे १९८९ च्या अंदाजपत्रकात सरकारने या शस्त्रास्त्रांवरील खर्च टाळला, तेव्हा लास्ट यांना साहजिकच बरे वाटले. यानंतर अमेरिकेला काही जुने रणगाडे विकायचे होते; ते कॅनडाने घ्यावे किंवा नाही यासंबंधी त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी व्हायचे होते. खरे तर तेव्हा कॅनडाला या जुन्या रणगाड्यांची गरज नव्हती व शिवाय त्यांच्या देखभालीचा खर्चही जास्त होता. अखेरस तेही रणगाडे न घेण्याचा निर्णय झाला तेव्हा लास्ट यांना आपण चांगले काम करीत असल्याचे समाधान वाटले.

ग्रीस व टर्की (तुर्कस्तान) या देशांमध्ये सायप्रस या बेटासंबंधी वाद चालू होता तेव्हाची गोष्ट. त्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा तेथे दाखल झाल्या होत्या. कॅनडाची शांतीसैन्याची एक तुकडी तेथे होती. टर्कीच्या फौजांना पुढे जाण्यापासून कॅनडाच्या फौजांनी रोखले होते. १९९१ मध्ये लास्ट यांना सायप्रसला जाण्याची संधी मिळाली. तेथील अधिकाऱ्यांना विरूद्ध गटाबरोबर चर्चा करण्याचे व वाटाघाटी करण्याचे प्रशिक्षण त्यांनी दिले. आपल्याच सैनिकांना, अधिकाऱ्यांना ग्रीक व टर्कीचे नागरिक वा फौजी व्हायला त्यांनी सांगितले, आणि ती भूमिका प्रत्यक्ष जगून विविध प्रश्नांसंबंधीची उत्तरे शोधण्याचे प्रशिक्षण त्यांनी दिले.

याच काळात 'शांतीउद्याना'ची कल्पना त्यांना सुचली. सायप्रस बेट ग्रीस व टर्की यांच्यात विभागले गेले आहे. रोकास बॅशन ही एक रिकामी जागा असून त्याच्या आजूबाजूला हिरवळ पसरलेली आहे. त्याच्यामधून सायप्रस बेट विभागले गेले आहे. या मध्यवर्ती जागेत दोन्ही बाजूंसाठी एक 'शांतीउद्यान' निर्माण करावे असे लास्ट यांच्या मनात होते. ही कल्पना त्यांना अंमलात आणता आली नाही पण त्या काळात उभयपक्षांत शांतता नांदावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले.

यानंतर त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी म्हणजे लास्ट यांच्यासाठी जणू मेजवानीच होती. कनास येथील लिव्हनवर्थ येथे असलेल्या अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांसाठी असलेल्या प्रशिक्षण महाविद्यालयात त्यांना काही महिन्यांसाठी शिकविण्याची संधी मिळाली. या काळात त्यांनी 'कॉन्फ्लिक्ट डी-एस्कलेशन' (संघर्ष कमी करत नेणे) असे एक पुस्तक लिहिले. हैती येथील संघर्षात, अमेरिकेच्या लष्करी

अधिकाऱ्यांची भूमिका शांततेसाठी तयार करणे, असे प्रशिक्षण त्यांनी दिले. या काळात (१९९४-१९९५) त्यांनी दुसरी उच्च पदवीही मिळविली. कनास येथे शिकविण्याचे काम लास्ट यांच्यासाठी प्रतिष्ठेचे ठरले. कारण येथे अमेरिकेच्या लष्करातील एक हजार अधिकारी, नौदल व हवाईदलातील काही निवडक अधिकारी आणि इतर ७२ देशांमधील निवडक अधिकारी असे सुमारे १२०० विद्यार्थी-अधिकारी त्यांच्यासमोर होते. अमेरिकेतील अधिकाऱ्यांना तर प्रथम आपल्याला कॅनडातील एक व्यक्ती शिकविणार ही कल्पनाच मान्य होत नव्हती. (अमेरिकेतील बहुतांश अधिकाऱ्यांमध्ये कॅनडातील अधिकाऱ्यांबद्दल फारशी चांगली भावना नव्हती. 'आपण श्रेष्ठ,' असा त्यांचा समज होता.) आणि येथे लास्ट त्यांना, "आपण शांतीसैन्य म्हणून दुसऱ्या देशांतील नागरिकांची, लष्कराची मने कशी जिंकली पाहिजेत, त्यांचे गैरसमज दूर करू न व त्यांना मदतीचा हात पुढे करून, त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे," असे सांगत होते.

शिकविण्याच्या या कामावरून लास्ट यांना बोस्निया येथे जावे लागले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतीसैन्यात 'डेप्युटी फोर्स कमांडर' म्हणून त्याची नियुक्ती झाली. या काळात त्यांचे जीवन फार धोक्यात होते. अगदी त्यांच्या हेलिकॉप्टरवर गोळीबार देखील करण्यात आला होता. येथील अतिशय हिंसक अशा संघर्षात शांतता प्रस्थापित करण्याचे कोणतेही प्रयत्न अशक्य कोटीतील वाटत होतें. तरीदेखील लास्ट तेथे टिकून होते. नागरी भागात, लष्कराचे कामकाज अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेचा लोकांना परिचय करून देणे व सर्व स्थानिक संस्था, संघटनांचा पाठिंबा शांततेने प्रश्न सुटावा यासाठी मिळविणे, ही जबाबदारी त्यांच्याकडे होती.

डेव्हिड लास्ट सध्या किंगस्टन येथील 'रॉयल मिलिटरी कॉलेज'मध्ये शिकवितात. आंतरराष्ट्रीय शांततेसाठी अभ्यासक्रम त्यांनी सुरू केला आहे. आता तर विविध देशांमधील लष्करी अधिकारी 'ई-लर्निंग'द्वारे (डिस्टन्ट लर्निंग) त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. संघर्ष निर्माण होण्याआधीची स्थिती ओळखून तो हिंसकतेकडे जाण्याआधीच त्यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे, असाही एक अभ्यासक्रम सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लष्करी प्रशिक्षणातच संघर्ष मिटविण्याच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्याचे प्रयत्न आता होत आहेत. 'युद्धविरोधी योद्धा' असे मेजर डेव्हिड लास्ट यांना म्हटले गेले आहे ते खरेच आहे.

*(संदर्भ - मेट्टा स्पेन्सर यांचा 'पीस मॅगेझिन' मधील लेख)*

# जगाच्या पाठीवर..... नैसर्गिक आपत्ती, पर्यावरण व 'प्रादेशिकता'

पृथ्वीचे वाढते तपमान आणि ढासळते पर्यावरण या बाबी पर्यावरणतज्ज्ञांसाठी काळजीच्या असल्या तरी औद्योगिक संस्थांनी व राजकीय नेत्यांनी हा विषय फारशा गांभिर्याने घेतलेला नाही. पर्यावरणाच्या रक्षणासाठी, जागतिक पातळीवर 'क्योतो प्रोटोकॉल' तत्त्वतः मान्य करण्यात आला होता. या करारानुसार पृथ्वीचे वाढते तापमान रोखण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आली होती. उत्पादकांनी काही विशिष्ट वायू वापरू नयेत आणि पृथ्वीचे संरक्षण करणारा वातावरणातील ओझोनचा थर नष्ट होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे ठरविण्यात आले होते.


पर्यावरणाचे नुकसान करण्यात अमेरिकेतील अनेक उद्योगांचा मोठा सहभाग आहे. आणि हा करार पाळण्यासाठी अमेरिकेतील औद्योगिक कंपन्यांवर अनेक बंधने येणार होती. त्यामुळे औद्योगिक संस्थांचा नफा कमी झाला असता व पर्यायाने अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान झाले असते. त्यामुळे अमेरिकेने तो मंजूर करण्याचे नाकारले, (पाहा - 'पर्यावरण रक्षणातील राजकारण', 'अर्थबोधपत्रिका' अंक १६, जुलै -ऑगस्ट २००१) त्यानंतर रशियानेही, आपण तो मान्य करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. इतर काही देशांनी तो मान्य करण्याची तयारी दर्शविली तरी, 'क्योतो प्रोटोकॉल' हा आता रद्द झाल्यात जमा आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. जरी तो पुन्हा अंमलात आणण्याचे ठरविले तरी त्यात बदल करण्याचे मोठे काम करावे लागेल.

या पार्श्वभूमीवर, पृथ्वीचे वाढते तपमान व वातावरणातील बदल हे संशोधकांसाठी काळजीचे विषय ठरत आहेत. युरोपमध्ये आलेली उष्णतेची लाट, अमेरिकेतील वादळे व जंगलातील आगींच्या वाढत्या घटना, आशियातील पूर या सर्व नैसर्गिक आपत्ती वा घटना संशोधकांसाठी काळजीच्या ठरताहेत. सर्वच घटनांचा संबंध वातावरणातील बदलांशी लागेलच असे नाही, तरी अशा वारंवार घडणाऱ्या घटना त्या दिशेकडे घेऊन जाऊ शकणाऱ्या ठरू ही शकतात. पर्यावरणाचे नुकसान रोखण्यात, जागतिक पातळीवर जर काही उपाययोजना होऊ शकत नसेल तर प्रादेशिक पातळीवर काही करता येईल तर बघावे, असा विचार आता या क्षेत्रांत बळावतो आहे.

*(संदर्भ - नेचर, डिसेंबर २००३)*

# आशिया व नैसर्गिक आपत्ती

आशियात भूकंप, पूर वा वादळे अशा नैसर्गिक आपत्ती या नेहमीच्याच घटना आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अलीकडच्या एका अहवालात नमूद करण्यात आले आहे की, जगात, इतर खंडांच्या तुलनेत आशियात नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे. अशा आपत्तींमुळे होणारे नुकसान हे वाईटच असते; पण त्यापेक्षाही जास्त नुकसान, अशा घटनांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली तयारी नसणे आणि अपुऱ्या तयारीनिशी ती परिस्थिती हाताळण्याची पद्धत यांमुळे होते. 'रिड्युसिंग डिझास्टर रिस्क : अ चॅलेंज फॉर डिव्हलपमेंट' या अहवालात नैसर्गिक आपत्तींमुळे विविध खंडांमधील किती नागरिकांचा मृत्यू होतो ते देण्यात आले आहे. (खालील आलेख पाहावा) (आलेखात १९९० ते १९९९ च्या दरम्यान, दर दशलक्ष लोकसंख्येमागे, नैसर्गिक आपत्तींमध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या दर्शविण्यात आली आहे.)





हा अहवाल काही दृष्टीने महत्त्वाचा आहे. कारण, भविष्यातही आशियालाच नैसर्गिक आपत्तींना मोठ्या प्रमाणावर सामोरे जावे लागेल असा अभ्यासकांचा अंदाज आहे. पृथ्वीचे तपमान वाढत असल्याने त्याचाही परिणाम हवामानावर होऊ शकतो. त्यामुळे कदाचित पुरांचे प्रमाण व तीव्रताही वाढू शकते. आणि कधीकधी या तीव्रतेचा अंदाज वर्तविणेही शक्य होणार नाही. एके काळी पर्यवरणाचा समतोल समुद्रकाठच्या 'कोरल (प्रवाळ) रीफ़'चे आणि पाणथळ प्रदेशातील झाडे-जंगले यांच्यामुळे राखला जात होता आणि वादळ व पूर यांना अटकावही होत असे. पण आता, वाढत्या पर्यटनामुळे त्यांचे नुकसान होते आणि पुराच्या शक्यताही वाढतात. समुद्राकाठच्या नागरिकांना व पर्यटकांना या गोष्टींची माहिती दिली तर काही कृती होऊ शकेल ?

*(द इकॉनॉमिस्ट, ७ फेब्रुवारी २००४)*

# कालप्रवाहात...... देशादेशांमधील असमानता

देशादेशांमधील मिळकतीतील असमानता हा एक अभ्यासाचा व काळजीचा विषय आहे. विशेषतः जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता वाढत असल्याचा दावाही काही अभ्यासक करीत आहेत, त्यामुळे ही विषमता आणखीनच महत्त्वाची ठरते आहे. ही विषमता मोजण्याचा एक मार्ग म्हणजे 'जिनी गुणक' (जिनी को-एफिशियन्ट - Gini coefficient) आहे. हा गुणक जेवढा जास्त तेवढी विषमता जास्त. एखाद्या देशातील सर्व नागरिकांची मिळकत समान असेल तेव्हा 'जिनी गुणक' हा शून्य असतो. काही विकसनशील राष्ट्रांमध्ये हा गुणक जास्त आहे, म्हणजेच त्या देशांमध्ये विषमता जास्त आहे. जपान, स्वीडन आणि नॉर्वे येथे आर्थिक विषमता कमी आहे असे आढळले. खालील आलेखावरून हे स्पष्ट होईल.




*(संदर्भ - वर्ल्ड बँक, इकॉनॉमिक टाइम्स)*

अर्थकारणाच्या प्रत्येक चळवळीत सक्रीय सहभागी

स्तंभयोरुभयोंमध्ये दिपमाला विराजते
महाराष्ट्रधिकोषस्य मुद्रेयं लोकमङ्गला

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

: केंद्रीय कार्यालय :
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर,
पुणे – 411 005.
Web : www.maharashtrabank.com

## अर्थबोधपत्रिका चौकस गट

### सभेची सूचना (रविवार दिनांक २ मे २००४)

नव्याने पसरू पाहत असलेल्या ज्ञानयुगात, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या औपचारिक शिक्षणाच्या कक्षांबाहेर पडून व्यापक ज्ञानमय जगाची अधिक ओळख करून घेतली पाहिजे, अशी गरज तीव्रतेने निर्माण झाली आहे. आणि यासाठीच भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी एकत्र येऊन चौकस गटाची स्थापना केली आहे.

चौकस गट हा कोणतीही राजकीय, आर्थिक वा धार्मिक प्रणाली गृहीत धरून अभ्यास करणारा गट नाही. स्वतंत्र विचार करणे, अभ्यासाने विचाराला खतपाणी घालणे, विवेकशक्ती जागृत करणे आणि स्वतंत्र विचाराने व्यक्तिगत विकासापासून ते राष्ट्रमर्यादा ओलांडून जागतिक विकासाची दिशा शोधणे, अशा तऱ्हेचा हेतू या गटाच्या स्थापनेमागे आहे. या गटाचे सदस्यत्व स्वीकारलेले विद्यार्थी गटाच्या रविवार दिनांक २ मे २००४ रोजी सकाळी १० वाजता 'अर्थबोध'मध्ये होणाऱ्या पहिल्या सभेसाठी स्वखर्चाने उपस्थित राहतील.

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## भारतातील डाव्या मंडळींशी हितगुज

*(ज्येष्ठ रॉयवादी विचारवंत वि.म. तारकुंडे यांनी 'अ वर्ड टू इंडियन लेफ्टिस्ट' असा एक लेख 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट' च्या नोव्हेंबर २००३ च्या अंकात लिहिला आहे. त्या लेखातील काही महत्त्वपूर्ण मुद्दे 'अर्थबोधपत्रिकेच्या पुरवणी' द्वारे वाचकांपर्यंत पोचवीत आहोत. श्री. विश्वास नाईकनवरे यांनी केलेल्या या लेखाचा अनुवाद येथे संक्षिप्त स्वरूपात देण्यात येत आहे. हा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वीच बॅ. वि. म. तारकुंडे यांचे २२ मार्च २००४ रोजी निधन झाल्याची दुःखद बातमी आम्हाला समजली. - संपादक)*

माझ्या मते डाव्यांमध्ये कोण कोण मोडतात ही यादी जरा मोठी आहे. डावे म्हणजे (असे सगळे की) ज्यांना असे वाटते की, सध्याच्या आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेमध्ये समाजातल्या वरिष्ठ थराचा वरचष्मा असून त्यामुळे बहुसंख्याक हे नुकसानीत येतात आणि ते दारिद्र्याच्या, बेकारीच्या, निरक्षरतेच्या आणि अनारोग्याच्या परिस्थितीत खितपत पडून राहतात. डाव्यांमध्ये साम्यवादी, समाजवादी, मानवतावादी व इतरही काहींचा समावेश होतो आणि या मंडळींना वंचित बहुसंख्यांकांबद्दल सक्रिय सहानुभूती वाटते व त्यांना सध्याच्या प्रचलित आर्थिक व राजकीय व्यवस्थेमध्ये मूलभूत बदल हवा असतो.

अलीकडच्या जागतिक इतिहासामध्ये रशियातल्या साम्यवादी राज्याचा विलय ही एक अत्यंत महत्त्वाची घटना होय. त्या घटनेने हे दाखवून दिले की, वर्गलढ्यातून कामगारवर्गाचे राज्य खरोखर निर्माण होत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, सरकारच्या हाती सर्व उत्पादनाची साधने सोपविण्याचा व त्यामुळे आर्थिक स्पर्धा वगळण्याचा प्रयोग पूर्णतया फसल्याचा अनुभव आला.

रशियाच्या साम्यवादी सरकारच्या विघटनांपूर्वी जग अमेरिका व रशिया या दोन ध्रुवांवर होते आणि भांडवलशाही समर्थक व साम्यवाद-समाजवाद समर्थक अशा दोन गटांत ते विभागले गेले होते. भारतासारखी काही राष्ट्रे या सत्तांपासून अलिप्त असल्याचा दावा करीत होती. रशिया कोसळल्यानंतर जग हे एकाच ध्रुवावर अवलंबून

आहे आणि आता बहुतेक सर्व भांडवलशाही देशांचे पुढारीपण अमेरिकेकडे आहे. विसाव्या शतकाच्या मध्यावर एक जलद गतीची तंत्रज्ञानाची वाढ सुरू झाली. असे दिसते की सुरूवातीला या तांत्रिक प्रगतीचा उपयोग 'शीतयुद्धा'साठी (रशिया व अमेरिकेच्या) करण्यात आला. पण लवकरच जेव्हा असे दिसू लागले की, लष्करी आघाडीवर रशिया हा अमेरिकेशी फारशी गंभीर चढाओढ करू शकत नाही; तेव्हा मग तंत्रज्ञानातली वाढ ही नागरी उद्योगक्षेत्रावर आक्रमण करू लागली. त्यानंतर जे काही घडले त्याचे वर्णन 'तंत्रज्ञानात्मक क्रांती' असेच सार्थपणे करण्यात येऊ लागले. त्या घटनेमुळे भारतीय आर्थिक धोरणात दोन महत्त्वाचे बदल घडून आले.

भारतीय अर्थरचनेचे उदारीकरण

अलीकडे एक बदल झाला तो असा की, भारतातले उद्योगधंदे बंधमुक्त होऊ लागले. ते तोपर्यंत सरकारी नियंत्रणाखाली होते. गुंतवणूक व उत्पादन यांवर संख्यात्मक मर्यादा घालून त्या वेगवेगळ्या उद्योगांत अंमलात आणण्यासाठी परवाने आणि अधिकारपत्रे घेतली पाहिजेत, असे नियम करून सरकारने उद्योगांवर नियंत्रण लादले होते. अशी बंधने भारतीय अर्थव्यवस्थेवर घातली गेल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ दर वर्षी जेमतेम ३ टक्के एवढीच होऊ लागली. उलट, जे देश भारताच्या मानाने कमी विकसित होते व जे दुसऱ्या महायुद्धाअखेर स्वतंत्र झालेले होते, पण ज्यांच्या सरकारांनी अशी बंधने आपापल्या अर्थव्यवस्थेवर घालून घेतलेली नव्हती, त्यांचा आर्थिक विकास अधिक वेगाने झाला.

या अनुभवामुळे मग भारतीय अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्या निर्णयानुसार सरकारने लादलेल्या बऱ्याच मर्यादा काढून टाकण्यात आल्या. हे उदारीकरण १९९१ मध्ये व त्यानंतर सुरू झाले आणि आपल्या देशात औपचारिक रीतीने नवे आर्थिक धोरण स्वीकारले गेले. त्या सुमाराला जगावर आणि अर्थात भारतावरही जी आर्थिक मंदीची लाट आली होती, ती असूनही भारतीय अर्थरचनेने उदारीकरणानंतर अधिक जलद गतीने स्वतःची वाढ करून घेतली हे सिद्ध करणारा भरपूर पुरावा उपलब्ध आहे.

१९९४ साली भारतासह सुमारे ११५ देशांनी गॅट करारावर सह्या केल्या. जरी या आंतरराष्ट्रीय करारावर इतक्या उशीरा सह्या झालेल्या होत्या तरी तंत्रज्ञानातली वाढ आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामधली घोडदौड भारतामध्ये बरीच अगोदर म्हणजे १९८० नंतर चालू झालेली होती. जगावर आर्थिक मंदीचे सावट १९९५ च्या सुमाराला आले

आणि अजूनही ते तसेच आहे. तरीही बहुसंख्य अर्थतज्ज्ञांचे असे म्हणणे आहे की, हळूहळू जागतिकीकरणामुळे प्रगत देश आणि अप्रगत देश यांच्यामधली आज असलेली तफावत कमी कमी होत जाईल. भारतीयांचे उत्पन्न इतर देशांतल्या लोकांप्रमाणेच जागतिकीकरणामुळे सुधारले असले तरी तांत्रिक विकासाचा (जो जागतिक मुक्त व्यापाराप्रमाणेच जागतिकीकरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे,) उद्योगधंदे आणि शेती या क्षेत्रातल्या कामगारांच्या रोजगार उपलब्धतेवरील प्रतिकूल परिणाम, अगदी उघड दिसून येण्याइतका झाला आहे.

नवे तंत्रज्ञान उत्पादन वाढवते पण त्याला कामगार कमी लागतात. तेही त्याला कुशल आणि होता होईल तितके सुशिक्षित लागतात. तसे पाहिले तर आयात कर कमी करण्यांचे प्रमाण व इतर मर्यादा काढून टाकण्याचे काम भारतात खूपच मंद गतीने चालले आहे. तरीही आपल्याकडचे अनेक उद्योग आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देऊ न शकल्याने बंद पडले आणि इतर कित्येक उद्योगांना आपले कामगार कमी करावे लागले. तसे करताना त्यांना त्यांचे अकुशल कामगार घरी बसवावे लागले. तीच गत अशिक्षित कामगारांची झाली. त्यांच्याऐवजी अधिक कुशल व अधिक शिकलेल्यांना कामावर ठेवण्यात आले किंवा तशी नवी नोकरभरती करावी लागली. अनेक नवे उद्योग सुरू झाले पण त्यांमध्ये कुशल लोकांना आणि अधिक शिकलेल्यांना कामावर घेतले गेले. अशा रीतीने संघटित उद्योगांतून बाहेर पडलेले अकुशल कामगार मग असंघटित उद्योगक्षेत्रांत कामाला लागले पण त्यांचे पगार कमी झालेले होते आणि कित्येक उपासमारीकडे झुकले. काहीजण स्वयंरोजगाराच्या सरकारी योजनांकडे वळले (उदाहरणार्थ, आय.आर.डी.पी, ट्रायसेम, जवाहर रोजगार योजना वगैरे). काही असे कामगार बिगर सरकारी स्वयंरोजगार शोधू लागले. तरीही असे बहुसंख्य मुक्त कामगार बेकारच झाले आहेत.

## डाव्यांची नव्या आर्थिक धोरणासंबंधीची भूमिका

आता मी या लेखाच्या मुख्य विषयाकडे वळतो. तो विषय म्हणजे भारतातल्या डाव्यांनी या बदलत्या आर्थिक व राजकीय परिस्थितीविषयी स्वीकारलेल्या धोरणाची चिकित्सा. ही चिकित्सा करण्यापूर्वी अलीकडच्या काळात घडून आलेल्या मुख्य बदलांचे चित्र रेखाटण्याची मला गरज वाटते.

रशियातल्या साम्यवादी सरकारने भांडवलदारांच्या हातून उत्पादनाची सर्व साधने अखेर १९२१-२२ मध्ये काढून घेऊन ती आपल्या हाती घेतली. तेव्हापासून रशियातला

सर्व उद्योगधंदा सरकारच्या हाती सत्तर वर्षांहूनही अधिक काळ मालकी हक्काने राहिला. रशियातल्या उद्योगाला जगातल्या दोन मोठ्या सत्तांपैकी एका सत्तेचा संरक्षणात्मक हात पाठीशी होता आणि त्याला परकीय हल्ल्यालाही तोंड द्यावे लागले नाही, तरीही तेथील उद्योगाला हळूहळू अवकळा येऊ लागली. खरे तर रशियन साम्यवादी नेतृत्वाने अमेरिकेच्या नेतृत्वाखालच्या उद्योगधंद्यांच्या पुढे मजल मारून भांडवलशाहीपेक्षा समाजवादामध्येच उद्योग चांगला वाढतो हे सिद्ध करण्यासाठी रशियन उद्योगाला मदत केलेली होती. पण १९६० नंतरच्या दशकात रशियन उद्योगाची अधोगती सुरू झाली. साम्यवादी हुकूमशाहीची भरपूर मदत असूनही सरकारी मालकीच्या उद्योगांची अधोगती काही थांबविता आली नाही. अखेर असे उद्योग संपूर्ण कोसळले आणि ही अखेर १९९१ ते १९९८ या काळातल्या रशियन राज्यसत्तेच्या कोसळण्याबरोबरच घडून आली. हा अधःपात इतका परिपूर्ण होता की रशियन राजसत्ताही तुकडे होऊन अनेक राज्यांत विभागली गेली. असे घडताना त्या त्या ठिकाणचे उद्योगही त्या त्या राज्यांत गेले.

रशियातल्या सरकारी मालकीच्या उद्योगांची अधोगती होऊन अखेर ते कोसळून पडण्याच्या मागे दोन प्रमुख कारणे दिसून येतात. बाजारव्यवस्थेअभावी औद्योगिक उत्पादन आणि लोकांना खरेदी करण्याची इच्छा असलेल्या वस्तू यांची सांगड घालता येत नव्हती. ज्याची निर्मिती होत होती त्याचा ग्राहकांच्या अपेक्षांशी मेळ बसत नव्हता. दुसरे म्हणजे, एकाधिकार उपभोगणारा सरकारी मालकीचा उद्योग हा तंत्रज्ञानावर आधारलेल्या सुधारणा स्वीकारण्यासाठी फारसा तत्पर होऊ शकत नसे. अशा सुधारणा भांडवलशाही उत्पादक मात्र ताबडतोब उचलत असत. कारण त्यांना रोज उठून त्याच पदार्थांच्या इतर उत्पादकांशी स्पर्धा करावी लागत असे. सेवाक्षेत्रातही हेच घडत होते. अशा वस्तू आणि सेवा जवळपास त्यांच्या उत्पादनासारख्या असल्या तरी स्पर्धेचा प्रश्न निर्माण होतच असे.

सरकारी मालकीच्या उद्योगाचा पूर्ण बोजवारा उडाल्याला आता १४ वर्षे उलटून गेली असली तरी माझ्या माहितीप्रमाणे भारतातल्या किंवा भारताबाहेरच्या एकाही साम्यवाद्याला अशा बोजवाऱ्यामागच्या अंतर्गत विसंगती आणि कच्चे दुवे यांचा विचार करण्याची बुद्धी झाली नाही, की मार्क्सवादी ध्येयात अंतर्भूत असलेल्या सरकारी मालकीच्या उद्योगपद्धतीमध्ये काही बदल करण्याची गरज भासली नाही. याला एकमेव अपवाद मानवेंद्रनाथ रॉय यांचा होता. भारतातल्या समाजवाद्यांचे साम्यवाद्यांशी दोन बाबतीत मतभेद आहेत. भांडवलशाही फेकून देण्याची गोष्ट हिंसक क्रांतीमुळेच

होऊ शकते हे एक, आणि भांडवलशाही फेकून दिल्यानंतर लोकशाही नियंत्रणाखाली अर्थव्यवस्था स्थापन करण्यासाठी हुकुमशाहीची आवश्यकता असते हे दुसरे. या दोन्ही गोष्टी त्यांना मान्य नाहीत. हे दोन्ही मतभेद भांडवलशाहीचा नाश कशा तऱ्हेने करावयाचा यासंबंधीचे आहेत. समाजवाद्यांचे साम्यवाद्यांशी अंतिम उद्दिष्टाविषयी मतभेद नाहीत. ते उद्दिष्ट असे आहे की भांडवलशाहीच्या जागी उत्पादनाच्या सर्व साधनांवर राज्यसत्तेची मालकी झाली पाहिजे.

अलीकडच्या तंत्रशास्त्रीय क्रांतीमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना तोंड देण्यासाठी विकसनशील आणि अविकसित देशांना आर्थिक धोरणात दोन बाजूंनी बदल करावे लागले. एक म्हणजे, अर्थव्यवस्थेचे उदारीकरण. याला नवीन आर्थिक धोरणाची अंतर्गत बाजू म्हणता येईल. दुसरे म्हणजे, अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण, हिला या धोरणाची बाह्य बाजू म्हणता येईल. माझ्या मते, भारतातील साम्यवादी व समाजवादी मंडळी या अंतर्गत बाजूच्या (उदारीकरणाच्या) बाबतीत नव्या धोरणाशी जुळवून घेण्यात अंशतः अयशस्वी झाली आणि बाह्य बाजू, म्हणजे जागतिकीकरणाच्या बाबतीत तर ती पूर्णांशाने अयशस्वी झाली. या अपयशाचे कारण असे की, साम्यवादी आणि समाजवादी मंडळींना असे वाटते की, उत्पादनाच्या साधनांची मालकी राज्यसत्तेकडे असणे हे समाजवादाचे अंतिम उद्दिष्ट आहे. शिवाय दुसरे कारण हे की, मार्क्सवादावर त्यांची श्रद्धा असूनही ते कट्टर राष्ट्रवादीच राहिले होते.

'अधिकारपत्रे आणि परवान्यांचे राज्य' केवळ भारतीय उद्योगपतींच्याच तिरस्काराचा विषय नव्हते तर ते सर्वसाधारण जनतेमध्येही लोकप्रिय नव्हते. कारण आर्थिक उत्पादनावर घातलेल्या अशा मर्यादांचा लोकांना त्रास होत होता आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या महागाईचाही त्यांना फटका बसत होता. माझ्या माहितीप्रमाणे साम्यवाद्यांनी व समाजवाद्यांनी 'अधिकारपत्रे आणि परवान्यांच्या राज्या'ला उघडपणे विरोध केला नव्हता. कारण उद्योगधंद्यांच्या राज्यसत्तेच्या मालकीच्या दिशेने जाणारे हे एक पाऊल होते. पण अशा राज्याच्या उच्चाटनालाही त्यांनी गंभीरपणे विरोध केला नाही. बहुधा अशा उच्चाटनाच्या बाजूने तीव्र सार्वजनिक मतप्रवाह होता म्हणून.

अंतर्गत आर्थिक धोरणाचा आणखी एक भाग म्हणजे खाजगीकरण. सरकारी मालकीच्या उद्योगांचे अंशतः किंवा पूर्णांशाने खाजगीकरण या धोरणामध्ये अंतर्भूत होते. अर्थात काही उद्योगांच्या सरकारी मालकीची आवश्यकता होतीच. असे उद्योग म्हणजे सैन्याला लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती करणारे किंवा नोटांची छपाई करणारे व

नाण्यांचे उत्पादन करणारे उद्योग. परंतु समाजवादी धोरण अंगीकारणाऱ्या नेहरूंनी आणि चुकतमाकत तेच धोरण चालविणाऱ्या नेहरूंच्या उत्तराधिकारी सरकारांनी बरेच मोठे भारतीय भांडवल, ज्यांमध्ये अशी गुंतवणूक करण्याचे कारण नव्हते, अशा सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांमध्ये गुंतविलेले होते. उदाहरणार्थ, कोळशाच्या खाणी आणि उद्योगधंद्यांना लागणाऱ्या विजेची निर्मिती. अशा उद्योगात गुंतविलेल्या भांडवलावर वार्षिक ३ टक्क्यांच्यावर उत्पन्न निर्माण होत नाही. याच उद्योगात गुंतविलेल्या खाजगी मालकांच्या भांडवलावर याच्या दुप्पट वार्षिक उत्पन्नाची निर्मिती होते. अर्थातच, सार्वजनिक हिताचा विचार केल्यास अशा उद्योगांचे खाजगीकरण करून मिळणारे उत्पन्न रोजगार निर्मितीच्या योजनांसाठी, दारिद्र्यविमोचनासाठी, प्राथमिक/दुय्यम शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी, धंदेशिक्षणासाठी वगैरे बाबींसाठी वापरता येईल. अशा उत्पन्नातून आरोग्य सुधारता येईल आणि गोरगरिबांना स्वस्त किंवा मोफत औषधोपचार पुरवता येईल. काही फायद्यात चाललेल्या सरकारी मालकीच्या उद्योगांच्या बाबतीतही अंशतः खाजगीकरण करून त्यांचे काही समभाग लोकांना विकावेत आणि येणारे उत्पन्न वर उल्लेख केलेल्या कामांसाठी वापरावे, असे करता येईल. हा अंशतः खाजगीकरणाचा कार्यक्रमदेखील साम्यवाद्यांना आणि समाजवाद्यांना पसंत नाही आणि भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनाही तो पसंत नाही. या डाव्यांमध्ये रॅडिकल ह्युमॅनिस्टांना मात्र धरता येणार नाही. जेव्हा अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने दोन पेट्रोलियम कंपन्यांचे खाजगीकरण हे संसदेच्या अनुमतीखेरीज करणे कायद्यात बसत नाही या कारणाने रोखले, तेव्हा त्यांना जो प्रचंड आनंद झाला त्यावरून या मंडळींची नापसंती दिसून आली. भारतीय जनता पक्षाला या प्रकरणी आनंद झाला तो यासाठी की प्रतिस्पर्धी काँग्रेसने हे धोरण मुळात सुरू केले होते व न्यायालयाने ते रोखले होते. पण डाव्यांना आनंद झाला होता तो मात्र उद्योगांचे खाजगीकरण हे सरकारी मालकीच्या उद्योगांच्या त्यांच्या ध्येयाशी सरळ सरळ विसंगत होते म्हणून. खरे पाहता ज्या भारतीय वर्गांच्या हितसंबंधांचे रक्षण आणि संवर्धन करण्याची त्यांची इच्छा आहे त्यांच्याच हिताविरूद्ध डाव्यांचा खाजगीकरणाला विरोध आहे.

अविकसित देशांना आणि मोठ्या प्रमाणावर भारतासारख्या विकसनशील देशांना जागतिकीकरणामुळे दोन मोठे फायदे दीर्घ काळ मिळू शकतात. एक म्हणजे मुक्त व्यापार वाढला की परकीय भांडवलगुंतवणुकीवरचे असमंजस निर्बंध आणि नफ्यावरच्या मर्यादा दूर केल्या जातील व त्यामुळे परकीय भांडवलाची आयात जलद

व नेत्रदीपकरीत्या देखील वाढेल. हे विशेषत: भारतासारख्या देशात, देशांतर्गत प्रचंड वाढती बाजारपेठ असल्यामुळे हमखास घडेल. भारतासारख्या देशाचा जागतिकीकरणामुळे होऊ शकणारा दुसरा फायदा म्हणजे, अनेक परकीय उद्योग भारतात येतील किंवा त्यांच्या शाखा उघडल्या जातील. कारण, येथे स्वस्त कामगारवर्ग व प्रचंड अंतर्गत बाजारपेठ आहे. सर्वसाधारणत: ही आर्थिक उलाढाल स्थानिक उद्योगपतींच्या सहकार्याने होते; पण काही वेळा त्याशिवायही होते. जागतिकीकरणाच्या या दोन बाबींमुळे अविकसित व विकसनशील देशांचा भरपूर फायदा होईल. परकीय उद्योगांचाही जागतिकीकरणामुळे फायदा होईल. कारण, त्यांना योग्य स्पर्धात्मक नफा भांडवलगुंतवणुकीवर मिळेल. मागासलेल्या देशांत उद्योग पाठवून किंवा शाखा उघडून त्यांचा फायदाच होईल. अशा रीतीने दोन्ही पक्षांचा फायदा होणे हे जागतिकीकरणाचे महत्त्वाचे लक्षण असते.

असे उघडच दिसून येणारे फायदे असूनही भारतामधले डावे आणि भारतीय समाजातले बहुतेक लोक जागतिकीकरणाला विरोध करीत असतात. याचे कारण असे की त्यांचा दृष्टिकोण 'राष्ट्रवादा'ने पांगळा केलेला असतो. जागतिकीकरण समजण्यासाठी उदार मनाचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण आवश्यक असतो. या दृष्टिकोणाने समग्र मानवजातीची प्रगती डोळ्यासमोर ठेवली जाते आणि तिचेच संगोपन करून तिचा पुरस्कार केला जातो. या दृष्टिकोणाला सोयीसाठी 'मानवतावाद' असे नाव देता येईल.

हा जो 'संकुचित राष्ट्रवादी दृष्टिकोण' आपल्या बहुसंख्य भारतीयांमध्ये दिसून येतो तोच, ज्यांच्यावर वेळोवेळी सरकारपुरस्कृत धोरणानुसार उदारीकरण व जागतिकीकरणाच्या आर्थिक धोरणाची अंमलबजावणीची कामगिरी सोपविलेली असते, त्यांच्यामध्येही असतो. त्यामुळेच जरी नवे आर्थिक धोरण भारत सरकारने जानेवारी १९९० मध्येच अधिकृतरीत्या स्वीकारले असले आणि ते नंतरच्या, मागून आलेल्या सर्व सरकारांनीही मान्य केलेले असले, तरी त्याची अंमलबजावणी इतकी सावकाश व इतक्या अर्धवट इच्छाशक्तीने होत असते की आतापर्यंत १४ वर्षे उलटून गेली असली तरी काही अर्थतज्ज्ञांच्या अंदाजानुसार भारतीय अर्थव्यवस्थेचा ७२ टक्के भाग अद्यापही बंदिस्त रचनेतच राहिला आहे.

इतके त्रोटक जागतिकीकरण आणि उदारीकरण अमलात आणले असले तरीही त्याचे उपकारक परिणाम एव्हाना दिसू लागले आहेत. परकीय भांडवलाचा प्रवाह बराच वाढला आहे. तसेच परदेशी उद्योगांची आयात आणि त्यांच्या शाखांचा सुळसुळाट भारतामध्ये जाणविण्याइतका वाढला आहे. आता हे तर प्रसिद्ध आहे की, असे मोठे

उद्योग पुष्कळदा ज्यांच्याकडून त्यांना कित्येक वस्तू आणि सेवा उपलब्ध होतील, अशा छोट्या उद्योगांची सुरूवात करण्याला प्रोत्साहन देतात. अशा वस्तू आणि सेवा आपणच निर्माण करणे त्यांच्या दृष्टीने सोयीचे नसते. असे पूरक उद्योग भारतात सुरू होत असल्याच्या बातम्या कानावर येत राहतात. त्यामुळे अशी रास्त अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही की संभाव्य उद्योगप्रवण मंडळी या उद्योगविकासाच्या प्रक्रियेत उत्साहाने सहभागी होतील.

भारताच्या अणुबाँब बनविण्याच्या भूमिकेला डाव्यांनी पाठिंबा दिला होता ही त्यांची एक गंभीर चूक होती, असेही नमूद करावेसे वाटते. पण त्या राजकीय विषयाच्या खोलात शिरण्याचे येथे प्रयोजन नाही. फक्त त्याची आर्थिक बाजू येथे विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. अणुबाँबने भारताची सुरक्षितता वाढली नाही, उलट असुरक्षितता वाढली. शिवाय, भारतीय सरकारचे वित्तीय स्रोत आता अण्वस्त्रांच्या सिद्धतेसाठी आणि ती वाहून नेणाऱ्या वाहनांच्यासाठी लागत आहेत. त्यामुळे आता प्रचंड संख्येच्या दुर्बल घटकांना व दरिद्री जनतेला त्यांचा मागासलेपणा व आर्थिक दुर्बलता कमी करणारे कार्यक्रम चालू ठेवण्यासाठीही आर्थिक स्रोत उपलब्ध नाहीत. मग त्यात वाढ करण्याचा तर प्रश्नच उद्भवत नाही. मुळातच अशा कार्यक्रमांसाठी सरकारी तरतुदी तुटपुंज्या होत्या आणि आता त्याही कमी झाल्या. त्यामुळे अण्वस्त्रांवर खर्च करण्यापेक्षा शेजारी राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध व आण्विक निःशस्त्रीकरण याला महत्त्व देण्यात आले पाहिजे.

सर्व डावे आणि पुष्कळसे इतरही असे मानतात की, समतेवर आधारलेला समाज हा त्यांच्या ध्येयाचा महत्त्वाचा भाग आहे. कोणत्याही क्षेत्रात समता येणे हे जोपर्यंत भांडवलदारांची आणि जमीनदारांची उद्योगधंद्यांवर आणि शेतजमिनीवर मालकी असते तोपर्यंत अशक्य असते, याबाबत त्यांचे एकमत असते. म्हणूनच सर्व उत्पादनसाधनांची मालकी सरकारकडे असणे हे सर्व साम्यवाद्यांचे व समाजवाद्यांचे उद्दिष्ट बनले होते.

सोव्हिएट रशियातल्या साम्यवादी राजवटीचा अंत होऊन १४ वर्षे उलटल्यानंतरही आणि त्यातून सरकारी मालकीची औद्योगिक व्यवस्था ही अकार्यक्षम असते हे निर्विवादपणे सिद्ध होऊनही, जगाच्या कोणत्याही भागातल्या साम्यवादी किंवा समाजवादी पुढाऱ्याने असे सुचविले नाही की, भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेच्या जागी सरकारी मालकीची औद्योगिक व्यवस्था आणण्याच्या योजनेखेरीज अन्य काही योजना असावी.

फक्त मानवेंद्रनाथ रॉय यांनी त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात याबाबतीत काही पर्यायी अशी स्पष्ट सूचना केली होती. त्यांनी सुचविले होते की सध्याच्या भांडवलशाही मालकी हक्काऐवजी सहकारी मालकीची रचना असावी. ही सहकारी व्यवस्था सहकार्यावर आधारलेली असावी आणि त्या व्यवस्थेत उद्योगाचे मालक व नोकरवर्ग यांच्यामध्ये विरोध नसला पाहिजे. त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे दोन वर्षांनी एक अभ्यास शिबीर भरले होते त्यात हा तपशील काही अंशी तयार करण्यात आला होता.

हे लक्षात ठेवले पाहिजे की, भांडवलशाही उद्योगामध्येही मिळणाऱ्या उत्पन्नापैकी केवळ थोडाच भाग मालकाला नफ्याच्या स्वरूपात मिळतो. उत्पन्नाचा मोठा हिस्सा नोकरवर्गाचे पगार, वेतन वगैरेंमध्ये खर्च होत असतो. वर उल्लेखिलेल्या अभ्यासशिबिरामध्ये असे मत मान्य झाले की, कमीतकमी पहिल्या १० किंवा १५ वर्षांमध्ये भांडवलशाहीत उद्योगाची मालकी ज्यांच्याकडे होती त्याला, उद्योगाचे परिवर्तन सहकारी उद्योगात झाल्यानंतरही, या उद्योगाच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मिळाला पाहिजे. हा हिस्सा ठरविताना, त्याला जो योग्य नफा सहकारीकरण झाले नसते तर मिळाला असता, तितका तरी मिळावा ही दृष्टी ठेवावी. तशी तरतूद करणे हे भांडवलशाही उद्योगांचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी जे करार-मदार करावे लागतात ते करण्यासाठी पोषक ठरतात. खरे तर, सहकारी उद्योग हा अधिक कार्यक्षम ठरण्याची शक्यता आहे. कारण जे सगळे लोक उत्पादन प्रक्रियेत गुंतलेले असतील त्या सर्वांना या धंद्यात जास्तीत जास्त नफा मिळवून देण्याची इच्छा असणार. कारण, त्यांनाही नफ्यात वाटा असतो. या परिवर्तनाच्या बाजूने मालकवर्गावर दडपण आणण्याचे कामही कामगारांना करावे लागते. अर्थात हे दडपण फार असह्य असू नये. भांडवलशाही उद्योगांचे परिवर्तन सहकारी संस्थांमध्ये होण्यासाठी काही काळ जावा लागेल. पण हे होणे अव्यवहार्य नाही.

उद्योगधंद्यांच्या खाजगी मालकीमधून आणि शेतीव्यवसायाच्या खाजगी मालकीमधून येणारी सत्ता मार्क्सच्या काळी होती तितकी मोठी उरली आहे काय ? असे प्रत्ययास येत आहे की, आधुनिक काळात एखाद्या यशस्वी राजकीय नेत्याची सत्ता ही उद्योगाची मालकी असणाऱ्या किंवा शेतीची मालकी असणाऱ्यांच्यापेक्षा खूपच मोठी असते. याचे एक उदाहरण हिटलरचे घेता येईल. भारताच्या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यादेखील टाटा-बिर्लांपेक्षा अधिक शक्तिशाली होत्या. सध्याच्या लोकशाहीच्या काळात असे घडताना दिसते की राजकीय पुढाऱ्यांची मिरासदारी सर्व क्षेत्रात चालत आहे. जनतेच्या नावाने राज्यकारभार करणाऱ्या व्यक्ती, विविध पातळ्यांवरील संस्था (यात

स्थानिक स्वराज्य संस्थाही आल्या) व प्रशासन यंत्रणा यांच्या हाती सत्ता एकवटली जात आहे. लोकशाहीत सामान्य जनता दुबळीच ठरते आहे. पण आता स्वातंत्र्य आणि खऱ्या लोकशाहीचा लढा इथून पुढे वेगळाच आकार घेणार आहे. या नव्या स्वरूपात एका बाजूला जागरूक आणि स्वयंनिर्भर भारतीय जनता असेल व ती आपल्या हाती सत्ता घेण्यास उत्सुक असेल. दुसऱ्या बाजूला सत्तापिपासू राजकारणी लोक असतील आणि त्यांचे राजकीय पक्ष असतील. त्यांना लोकांच्या वतीने सत्ता हवी असेल. ती वरवर पाहता लोकांच्या हितांचे घोडे पुढे दामटण्यासाठी त्यांना हवी असते. पण तिचा उपयोग आतापर्यंतच्या पद्धतीने स्वतःच्या आकांक्षा फलद्रूप करण्यासाठी व स्वतःचे राजकीय हेतू साधण्यासाठीच केला जाणार आहे.

लेखाच्या पहिल्या परिच्छेदात उल्लेख केलेल्या भारतातील डाव्यांनी आता काय करावयास हवे आहे ?

(१) नव्या आर्थिक धोरणातील उदारीकरण व जागतिकीकरण करण्याला पाठिंबा द्यावा.

(२) भारत सरकारने, पाकिस्तान सरकारशी वाटाघाटी करून दोन्ही देश निःशस्त्रीकरण करतील यासाठी प्रयत्न करावा. म्हणजे सामान्य जनतेच्या विकासासाठी निधीची चणचण जाणवणार नाही.

(३) राष्ट्रवादाऐवजी उन्नत ध्येयवादी मानवतावाद अंगीकारावा. (मार्क्स हा सर्वात मोठा मानवतावादी होता)

(४) भारतात खरीखुरी लोकशाही नांदावी (राजकीय पक्षांची नव्हे !) यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून सुरूवात करून सर्वत्र लोकांचे राज्य असावे, यासाठी प्रयत्न करावे. जनतेच्या हाती सत्ता राहावी व त्यांनी त्याचा नीट उपयोग करावा यासाठी काळजी घेतली पाहिजे.

■■

# निर्भयता

*निर्भयता हा नव्या युगाचा मुद्रालेख आहे. आजचे शिक्षणशास्त्री म्हणतात, बालकांना कसलीच भीती घालू नका. शहाणे आणि समजूतदार आईबापदेखील आपली बालके निर्भय व्हावीत म्हणून अनेक तऱ्हेचे उपाय योजीत आहेत. आजची बालके निर्भय म्हणजे उद्याची मनुष्यजाति निर्भय.*

*नव्या युगाची पिढी ज्ञानाच्या पायावर उभारलेले निर्भय जीवन जगण्याची आकांक्षा धरीत आहे. वैज्ञानिक अथवा ज्ञानाच्या प्रगतीबरोबर भयाचा नाश अथवा अस्त होत जावा, हे अगदी स्वाभाविक आहे. एका काळच्या मनुष्याच्या जीवनाच्या विविध क्षेत्राच्या मूळाशी भीतीतत्त्वच अधिष्ठित झालेले होते. त्या काळी मनुष्य मनुष्याला भीत असे. जो बलवान त्याला बाकीच्यांनी भिऊन राहायचे हे जणू काय व्यवहारदक्ष मनुष्याच्या जगण्यांतील रहस्यच होऊन बसले होते. आज व्यक्तिजीवनात थोडा अधिक बदल झाला असला तरी भयाचे अधिष्ठान खूप जबरदस्त आहे हे जागतिक चळवळी लक्षात घेतल्यास कुणाच्याही लक्षात येईल. एक समाज दुसऱ्या समाजाला भीत आहे. आणि त्याचप्रमाणे आपल्यापेक्षा दुर्बल लोकांना दरडावीत आहे. राष्ट्राराष्ट्रांचीदेखील हीच स्थिती. मुसोलिनी, हिटलरसारख्या व्यक्तीदेखील, भयासारख्या, मनुष्याच्या जंगली अवस्थेतील तत्त्वावर स्वतःची प्रतिष्ठा वाढवू पाहात आहेत.*

*भीतीतत्त्वावर उभारलेल्या प्रतिष्ठेची, सामजव्यवस्था अथवा राज्यव्यवस्थेची एक मौज अशी की एक व्यक्ती दुसऱ्याला स्वतःविषयी भय निर्माण करून आपली प्रतिष्ठा वाढवीत असते. त्याच व्यक्तीच्या अंतर्यामी दुसऱ्याबद्दल भय उत्पन्न झाल्यामुळे त्याच्या ऱ्हदयाची धडधडही वाढत्या प्रमाणात सुरू असते. भय दाखवून जगणाऱ्यांचे मनही मानसशास्त्रदृष्ट्या भयप्रधान असे आढळते. जसजशी शस्त्रास्त्रांची वाढ होत आहे, कायदेबाजी वाढते आहे, तो तो भयाचे साम्राज्यही वाढते आहे. कारण भयाने ग्रासलेल्या मनुष्यालाच स्वसंरक्षणासाठी किल्ले, कोट, शस्त्रास्त्रे निर्माण करावी लागतील. आजची शस्त्रांस्त्रांची वाढ पाहिली की जग हे भयतत्त्वापासून मुक्त झालेले नाही हेच पटू लागते. आजचा सुधारलेला मनुष्य व रानटी मनुष्य यांच्या मानसिक भूमिकेत भयासंदर्भात फारसा निराळेपणा नाही. मात्र शस्त्रास्त्रे बदलली आहेत.*

(ताराबाई मोडक, शिक्षणपत्रिका, जानेवारी १९३६ वरून ) ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक( 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकासचंद्र चित्रे •मृणाल दत्तचौधरी •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**